# संपादकीय

## जुन्या पुस्तकांनाही चांगली मागणी

ॲमेझॉन डॉट कॉम ही ग्रंथव्यवहाराला सायबरयुगात नेऊन स्थानापन्न करणारी वेबसाइट. जगातील कुठलेही उपलब्ध पुस्तक वाचकग्राहकांपर्यंत पोचविण्याची तिची आद्यप्रतिज्ञा. त्या पुस्तकांची माहिती, त्या पुस्तकांवरचे अभिप्राय, त्याबद्दलची वाचकांची मते, सवलतीची किंमत वगैरे तपशील ॲमेझॉन डॉट कॉमवर सहजपणे सापडतात; आणि या वाचकग्राहकांना एकमेकांबरोबर संपर्क साधून संवादही साधता येतो. पुस्तकाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रियांची देवाणघेवाणही मुक्तपणे करता येते. ॲमेझॉन डॉट कॉमने ग्रंथविक्री क्षेत्राला एक नवे परिमाण दिले. त्याची व्याप्ती वाढविली. दुर्मिळ पुस्तके गरजू वाचकांना सहजपणे मिळवून देण्यासाठी ग्रंथविक्रेत्यांची मदत घेतली. त्याबद्दलची माहिती गोळा करण्यासाठी आणि ती संगणकावर भरण्यासाठी अफाट खर्च केला. पुस्तक विक्रीतून आरंभी चांगला फायदा ॲमेझॉन डॉट कॉमला झाला. परंतु पुढे पुढे मात्र व्यवहार वाढूनही तोटा वाढू लागला. त्या त्या पुस्तकाची प्रत मागणी आल्यावर कुरिअरमार्फत ग्राहकाच्या घरी पोचवण्याच्या खर्चातही वाढ होत गेली. त्यामुळे ग्राहकांना ते पुस्तक महाग पडू लागले. त्यामुळेही मागणीत घट होत राहिली. परिणामी हा व्यवहार नुकसानीचा होऊ लागला. तिसऱ्या वर्षी हा तोटा खूपच वाढला तेव्हा ॲमेझॉन डॉट कॉमने दृक्‌श्राव्य कॅसेटस् व खेळणी विकण्याचाही निणय घेतला. त्याचबरोबर इतरही वस्तूंच्या विक्रीत रस घेतला. ॲमेझॉन डॉट कॉमच्या धर्तीवर बऱ्याच वेबसाइटस निघाल्या; त्यांच्यामुळेही थोडाफार फटका बसला. धंदा विभागला गेला.

ग्रंथप्रेमी वाचकग्राहकांना परस्परांशी संपर्क साधता येण्याची सुविधा व मोकळीक ॲमेझॉन डॉट कॉमने आरंभीपासूनच दिलेली आहे. नोव्हेंबर २०००पासून या ग्राहकांना आपल्याकडील पुस्तकांची देवघेव करण्याचीही सवलत व सोय ॲमेझॉन डॉट कॉमने उपलब्ध करून दिली आहे. नव्या पुस्तकांच्या जोडीने त्या पुस्तकाच्या सेकंड हँड प्रतींचीही नोंद ॲमेझॉन डॉट कॉमवर केली जाऊ लागली. या जुन्या पुस्तकांची किंमत अर्थातच पुस्तकाच्या मूळ किंमतीच्या तुलनेने खूपच कमी असते. उदाहरणार्थ, दहा डॉलर अशी किंमत छापलेले नवे पुस्तक तर सेकंडहँड प्रतीची किंमत अर्धा किंवा एक डॉलर ह्यामुळे बरेच वाचक नव्या प्रतीऐवजी जुन्या प्रतीचींच मागणी करू लागले. आणि गेल्या दोन वर्षात ॲमेझॉन डॉट कॉमच्या एकूण उलाढालीत जुन्या पुस्तकांच्या व्यवहारात घसघशीत वाढ झाली. एका वाचकाने वाचलेले, वापरलेले पुस्तक दुसऱ्या वाचकाला स्वस्तात मिळत असल्याने पैसेही वाचू लागले आणि ते पुस्तक वाचण्याची व मिळवण्याची इच्छाही वाढू लागली. मागील वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत ॲमेझॉनच्या एकूण ग्रंथव्यवहारात पंधरा टक्के भाग या जुन्या पुस्तकांचा होता; आणि यंदाही तो कमी होण्याऐवजी वाढणारच आहे असा अंदाज आहे. जुन्या पुस्तकांच्या किंमती अल्प असल्याने त्यांना मागणी वाढत आहे; तसेच त्यावर लेखकाला नव्याने मानधन देण्याचीही गरज नसते. अर्थात अमेरिकेत अजूनही स्वस्तातल्या जुन्या पुस्तकांची खरेदी करण्यापेक्षा नवी करकरीत प्रत विकत घेणाऱ्यांची संख्या जास्त आहे; त्यामुळे



बहुतेक बुकस्टॉलमध्ये एकाच पुस्तकाच्या नव्या प्रतींप्रमाणेच जुन्या प्रतीही उपलब्ध असतातच. वाचकांना आपल्या आर्थिक क्षमतेनुसार जुनी व नवी प्रत घेण्यास वाव असतो. केवळ जुनी पुस्तके विकणारे ग्रंथविक्रेते त्यामानाने अगदीच कमी आहेत; परंतु काही विक्रेते त्या क्षेत्रातही आघाडीवर आहेत. काही विशिष्ट गावी तर विशिष्ट वेळी जुन्या पुस्तकांची प्रदर्शने आयोजित करून धूमधडाक्यात त्यांची विक्री केली जाते. अनेक दुर्मिळ पुस्तके आणि संग्राह्य पुस्तके चोखंदळ वाचक अभ्यासकांना तेथे सहजी मिळतात. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने ती एक पर्वणीच असते.

ॲमेझॉन डॉट कॉम ही अशा जुन्या पुस्तकांच्या विक्रेत्यांची व आपल्या ग्राहकांची गाठभेट घालून देते. प्रत्यक्ष नाही तर इंटरनेटद्वारे. त्याबद्दल थोडेसे सेवा शुल्क आकारले जाते. काही वेळा जुनी पुस्तके ही नवीन म्हणूनही स्वस्तात विकली जातात. कारण ती अगदी नव्यासारखीच असतात. पण ग्राहकाला ती पुस्तकांच्या मूळ किंमतीच्या तुलनेत निम्म्यापेक्षाही कमी किंमतीत मिळतात.

द ऑथर्स गिल्ड या साहित्यकारांच्या संघटनेने ॲमेझॉन डॉट कॉम या जुन्या पुस्तकांच्या विक्रीव्यवहाराला चालना देण्याच्या प्रयत्नाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. चिंताही व्यक्त केली आहे. ऑथर्स गिल्डने आपल्या ८२०० सदस्यांना नुकताच ई-मेल वरून एक संदेश पाठविला आहे. ‘‘ॲमेझॉन डॉट कॉमने जुन्या पुस्तकांच्या विक्रीला मोठ्या प्रमाणावर चालना देऊन त्या व्यवसायाला प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न चालवला आहे. हा प्रकार लेखकांच्या दृष्टीने तोट्याचा आहे. कारण नवीन पुस्तकाच्या प्रतीच्या विक्रीवर लेखकाला मानधन मिळते. ते जुन्या पुस्तकाच्या प्रतीच्या विक्रीवर मिळत नाही. प्रकाशकांचेही त्यामुळे नुकसान होते. तेव्हा ऑथर्स गिल्डच्या सदस्यांनी ॲमेझॉन डॉट कॉमला आपल्या पुस्तकांची माहिती देण्याचे व आपल्या वेबसाइटशी असलेल्या ॲमेझॉनच्या साटेलोट्याचे प्रकार थांबवावेत.’’

दि ऑथर्स गिल्डच्या ई-मेलसंदेशाबद्दल अनेक जाणकारांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. जुनी पुस्तके ही जगभर सर्वत्रच विकली जातात. पुस्तकाची नवीच प्रत वाचकांनी विकत घ्यावी असा आग्रह धरणे व्यर्थ आहे. कुठलेही पुस्तक हे एका वाचकाने विकत घेतले म्हणजे ते जन्मभर त्याच वाचकाने जवळ ठेवावे असा दंडक घालणे व्यावहारिकदृष्ट्या भाबडेपणाचे ठरेल. वाचकाची त्या पुस्तकाची गरज संपली किंवा त्याच्याकडे जागा नसली तर ते रद्दीच्या दुकानात वा इतर कोणाकडे तरी जातोच. बरे, जन्मभर एखाद्या वाचकाने ते पुस्तक सांभाळले तरी त्याच्या मृत्यूनंतर त्याचे वारस त्या पुस्तकाची कशी विल्हेवाट लावतील हे तरी कोणाला सांगता वा ठरवता येईल का? साहजिकच, नव्या प्रतींप्रमाणे जुनी पुस्तकेही बाजारात येत राहणार, त्यांची खरेदी-विक्री होत राहणार हे स्पष्टच आहे. त्यामुळे दि ऑथर्स गिल्डच्या या भूमिकेबद्दल सर्वांनाच आश्चर्य व गंमत वाटत आहे. अशी तक्रार करणे हे पोरकटपणाचे आहे. उलट ॲमेझॉनमुळे जुन्या पुस्तकांच्या देवघेवीला चालना मिळून ती पुस्तके वाळवीच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून वा केराच्या टोपलीत जाण्यापासून वाचतील व इच्छुक वाचकांपर्यंत पोचत राहतील, पुस्तकाचे खरे सार्थक ते जास्तीत जास्त वाचकांनी वाचण्यात आहे. कपाटात बंदिस्त राहण्यात नाही.






दि असोसिएशन ऑफ अमेरिकन पब्लिशर्स या संस्थेच्या अध्यक्षा पॅट्रिशिया श्रोडर यांनी ‘‘पुस्तके विकत घेणे किंवा विकणे हा व्यवहार पूर्णतया कायदेशीर आहे. त्यात गैर काहीही नाही.’’ असे म्हटले आहे. नवे पुस्तक व जुने पुस्तक यात फरक कसा करायचा असाही प्रश्न पडतो. एखाद्या वाचकाने नवे पुस्तक प्रसिद्ध झाल्याबरोबर खरेदी केले; त्याच दिवशी वाचून बघितले व दुसऱ्या

दिवशी विकायला काढले तर? ते नव्यासारखेच राहते. पण जुने पुस्तक म्हणून कमी किंमतीत विकले जाते. तेव्हा पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर किमान तीन महिने तरी त्याच्या 'जुन्या' प्रती विक्रीला ठेवू नयेत अशी ऑथर्स गिल्डतर्फे मागणी करण्यात येणार आहे. तोपर्यंत ॲमेझॉन डॉट कॉमशी आपल्या सदस्यांनी 'डीलिंकिंग' करावे असेही ऑथर्स गिल्डचे म्हणणे आहे.

जुन्या पुस्तकांच्या विक्रीला नवे संघटित स्वरूप प्राप्त होण्याची चिन्ह आता दिसत आहेत. ज्याला जे परवडेल त्याने ते घ्यावे; परंतु एकूण ग्रंथव्यवहार वाढावा, ग्रंथांचा प्रसार व्हावा, ग्रंथांचा वापर अधिकाधिक व्हावा असा ॲमेझॉनचा हेतू आहे. आपल्याकडे बरेच ग्रंथप्रेमी व अभ्यासक जुन्या पुस्तकांच्या शोधात फूटपाथ धुंडाळत असतात. आणि नवीन पुस्तके ही देखील आपले नवेपण बराच काळ मिरवीत असतात. पहिली आवृत्तीच काही वेळा वीसवीस वर्षे बाजारात असते. तिला प्रकाशकही 'जुनी' म्हणत नाहीत. नव्यासारखीच त्या आवृत्तींच्या प्रतींचीही काळजी घेत असतात. तेव्हा इथल्या लेखक संघटनांना अशी काही तक्रार करायला वाव नाही. ॲमेझॉन सारख्या उपक्रमामुळे झाला तर आपल्या वाचकांचा फायदाच होईल. **- संपादक**



## वाचकांना भूरळ घालणारी आमची नवी जुनी दर्जेदार प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
|   **लज्जा** किंमत : १२५रु. |   **आपण सारे अर्जुन** किंमत : ८०रु. |  **लाइफ स्टाइल** किंमत : १२०रु. |  **चौघीजणी** किंमत : ३००रु. |
|  **द्वंद्व** किंमत : १५०रु. |   **ब्लास्फेमी** किंमत : १५०रु. |   **चाकाची खुर्ची** किंमत : १८०रु. |   **आय डेअर :** किरण बेदी किंमत : २००रु. |






### नाशिकचे सांस्कृतिक वैभव

दादासाहेब फाळके, कुसुमाग्रज आणि प्रा. वसंतराव कानेटकर या तिघांना माय मराठीच्या गळ्यातल्या रत्नहारात मानाचे स्थान आहे.

गेल्या वर्षी नाशिकच्या पांडवलेण्यांच्या पायथ्याशी भव्यदिव्य अशा बाबासाहेब फाळके स्मारकाचे उद्घाटन झाले.

नुकतेच कुसुमाग्रज स्मारकाचेही भूमिपूजन झाले. त्या पाठोपाठ २०मार्च रोजी प्रा. कानेटकरांच्या ८१व्या जन्मदिनानिमित्त 'वसंत विश्व'या संस्थेने विविध उपक्रमांची घोषणा केली आहे.

'वसंत विश्व' प्रा.वसंत कानेटकर स्मृती मराठी नाट्य आणि साहित्य संस्थेची स्थापना झाली आहे. कानेटकर कुटुंबियांची साथ मिळाल्यामुळेच 'वसंत विश्व'मूर्त स्वरूपात अवतरू शकले आहे.

जन्मत:च साहित्याचा वारसा लाभलेल्या वसंतरावांनी वयाच्या अठराव्या वर्षी 'जन्माचे गुलाम' ही कथा लिहून मराठीच्या दरबारात पाऊल ठेवले, पुढे पस्तीशीपर्यंत त्यांनी तीन कादंबऱ्याही लिहिल्या. मग मात्र त्यांनी नाट्यलेखनाला सुरुवात केली. ऐतिहासिक आणि पौराणिक नाटकांतही वसंतरावांनी अधिकाधिक अचूकता, आशयगर्भता व संदर्भसंपन्नता जपण्याचा ध्यास घेतला. हे करताना त्यांनी या नाटकांना लोकप्रियताही मिळवून दिली. इतिहासातल्या पात्रांची वर्तमानाशी सांगड घालण्याच्या त्यांच्या कौशल्यामुळे व कौटुंबिक स्वास्थ्य जपण्याच्या संदेशामुळे सर्वसामान्यांना कानेटकरांची नाटके आपली वाटत आली आहेत.

गेल्या वर्षी ३० जानेवारीस कानेटकर निवर्तले. त्यांनंतर त्यांच्या नावाने कार्य सुरू व्हावे यादृष्टीने वसंतरावांचे पुत्र प्रियदर्शन तसेच कानेटकर कुटुंबियांचे स्नेही आ.प्रशांत हिरे यांनी प्रथम 'वसंत विश्व'ची संकल्पना मांडली. त्याला सिंधूताईंनी होकार देऊन या संस्थेचे उपाध्यक्षपद स्वीकारून सक्रिय सहभागाची तयारी दाखविली. मग प्रियदर्शन यांच्या अध्यक्षतेखाली अरुण कानेटकर उपाध्यक्ष, आ.प्रशांत हिरे-कार्याध्यक्ष, प्रदीप सराफ-कार्यवाह, विवेक पाटणकर-खजिनदार व मु.शं.औरंगाबादकर यांची मानद सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. कार्यकारिणीत मोहन वाघ, शौनक अभिषेकी, वंदन पोतनीस, गिरीश टकले, जयप्रकाश जातेगावकर, मधुकर झेंडे आणि धनंजय वडनरे यांचाही सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

२० मार्च या प्रा. कानेटकरांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून 'वसंत विश्व'ने चार दिवसांचा वसंतोत्सव आयोजित केला. त्या अंतर्गत १७ मार्चला प्रा.कानेटकरांच्या नाट्यकृतींमधील विविध प्रवेशांचे सादरीकरण करण्यात आले. पुढचे तीन दिवस पुण्याच्या भरत नाट्य मंदिरने संगीत 'मत्स्यगंधा', मुंबईच्या नाट्यसंपदाने 'इथे ओशाळला मृत्यू' आणि चंद्रलेखाने 'प्रेमा तुझा रंग कसा'

ही नाटके सादर केली. २० मार्चलाच प्रा. राम शेवाळकर यांचे 'कानेटकरांच्या नाट्यकृती'या विषयावर व्याख्यानही झाले.

उद्योगपती श्रीरंग सारडा व गोदावरी, जनलक्ष्मी, नामको, मर्कन्टाईल, राजलक्ष्मी, पीपल्स, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँका आणि नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीने या सोहळ्याचा खर्च उचलल्याने नाटके विनामूल्य दाखवून 'वसंत विश्व'ने आपले उद्देश, योजना लोकांपुढे मांडल्या. मराठी साहित्य, नाटक, संगीत, विविध ललित कला, शिक्षण व इतर कलाविष्कारांना उत्तेजन देण्यासाठी स्थापन झालेल्या या संस्थेतर्फे कानेटकरांचे साहित्य जगभर पाहोचविणे, विविध विषयांवरील चर्चासत्रे, नामवंत वक्त्यांची व्याख्याने, प्रशिक्षण शिबिरे, उद्बोधक सहली आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. हुशार, होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, सामाजिक संस्थांना त्यांचे लोकोपयोगी कार्यक्रम राबविण्यास मदत करणे याबरोबरच प्रा.कानेटकर यांचे स्मारक व संग्रहालय उभारणे व कानेटकरांच्या नावाने दरवर्षी एक लाख रुपयांचा पुरस्कार देणे या दोन घोषणाही 'वसंत विश्व'तर्फे करण्यात आल्या आहेत. पंधरा लाख रुपयांचा निधी उभारून त्याच्या व्याजातून या योजना राबविण्याचा संस्थेचा मनोदय आहे.

## साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने दादासाहेब गायकवाड यांचा गौरवग्रंथ

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात येणार असून, त्याचे निमंत्रक म्हणून ख्यातनाम साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा.रं.बोराडे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची एक बैठक सोलापुरात नुकतीच झाली. त्यानंतर वार्ताहरांशी बोलताना ते म्हणाले की, या बैठकीत मंडळाने दोन महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यातील पहिला म्हणजे हा गौरवग्रंथ तयार करणे. दुसरा म्हणजे, राज्य सरकारच्या अखत्यारीतील सर्व मंडळांना एका छत्राखाली आणून त्यांच्यात समन्वयासाठी पाठपुरावा करणे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या कार्याची नव्या पिढीला अजिबात ओळख नाही. जुन्या पिढीतील फार थोड्या लोकांना त्यांचे कार्य ठाऊक आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या कार्याचे महत्त्व जाणून राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने हा गौरवग्रंथ तयार करण्याचे ठरले आहे. डॉ.निर्मलकुमार फडकुले यांच्यासारख्या साक्षेपी निमंत्रकाच्या मार्गदर्शनाखाली हा ग्रंथ निघतो आहे, ही वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे, असे श्री. बोराडे यांनी नमूद केले.

राज्य सरकारच्या वतीने विश्वकोश मंडळ, साहित्य संस्कृती मंडळ, सांस्कृतिक कार्य संचालनालय, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, हिंदी सिंधी अकादमी, पुरातत्त्व विभाग असे निरनिराळे विभाग चालवले जातात. मात्र या प्रत्येकाची इमारत आणि कामकाज वेगवेगळ्या ठिकाणी चालते. ते जर एकाच इमारतीत चालले तर अधिक व्यापक आणि गतिमान पद्धतीने ते कार्यान्वित होतील, हे जाणून या साऱ्या विभागाचे केंद्रीकरण करण्याची मागणी सरकारकडे केली जाणार आहे.

एका मोठ्या प्रशासकीय इमारतीत ही कार्यालये आणि ग्रंथालय, तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या व्यक्तींची अल्पदरात राहण्याची मर्यादित दिवसांसाठी सोय अशी सुविधा झाली तर तीचा फायदा सर्वांनाच होईल, असे ते म्हणाले.



सोलापूरात महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाच्या 'प्रासादमंडन' आणि 'सानेगुरुजी' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. र.वा. कुलकर्णी आणि राजा मंगळवेढेकर हे या पुस्तकांचे लेखक आहेत. डॉ.द.ता. भोसले आणि डॉ.निर्मलकुमार फडकुले यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले. यावेळी मंडळाचे सदस्य बालमोहन आदलिंगे, लक्ष्मण गायकवाड, मंडळाचे सचिव सूर्यवंशी, सोलापूरातील साहित्यिक डॉ.गो.मा. पवार, कवी दत्ता हलसगीकर, लक्ष्मीनारायण बोल्ली प्रभृती उपस्थित होते.

## काव्य व बालनाट्य लेखन स्पर्धा

लळित रंगभूमीतर्फे नवोदित कथांचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह काढला जाणार असून यासाठी काव्यलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या २१ काव्यरचना संग्रहात समाविष्ट केल्या जातील. तसेच बालनाट्य निर्मितीला प्रोत्साहन मिळावे यासाठी संस्थेने बालनाट्य लेखन स्पर्धाही आयोजित केली आहे.

स्पर्धेत प्रथम येणाऱ्या नाटकाचे जास्तीत जास्त प्रयोग घडवून आणण्यात येतील. या स्पर्धेस विषयाचे बंधन नाही. बालनाट्य संहिता व कविता २५ एप्रिलपर्यंत हेमंत भागवत, अध्यक्ष, लळित रंगभूमी, महाराष्ट्र राज्य, २१०, मावळे वस्ती, कॅनॉल रोड, कर्वेनगर, पुणे (दूरध्वनी : ५४५२८१२) या पत्त्यावर पाठवाव्यात.

## रायगड शाखेतर्फे कोकण साहित्य संमेलन

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड शाखेतर्फे २८ एप्रिल रोजी कर्जत येथील सप्तपदी सभागृहात साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

संमेलनाच्या अध्यक्षपदी वसंतराव जोशी असून श्रीमती मीरा वैद्य स्वागताध्यक्ष आहेत. कर्जतमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनंत जोशी संमेलनाचे उद्घाटन करतील.

संमेलनात कोमसापचे संस्थापक मधु मंगेश कर्णिक, कवी नारायण सुर्वे, न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे, प्रा.पु.द. कोडोलीकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## 'द स्पिरिट ऑफ लगान' वाचताना ते क्षण पुन्हा जगलो!

'' 'लगान' सारखाच भावोत्कट प्रवास सत्यजित भटकळ यांनी लिहिलेले पुस्तक 'द स्पिरिट ऑफ लगान' हे पुस्तक वाचताना मी अनुभवला, कित्येकदा माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले, त्या काळात आम्ही जगलेला प्रत्येक क्षण हे पुस्तक वाचताना मी जगलो...'' असे उद्गार निर्माता-अभिनेता आमिर खान याने एनसीपीएच्या सभागृहात झालेल्या शानदार प्रकाशन समारंभात काढले आणि प्रेक्षागृह हेलावले.

'लगान'च्या निर्मितीतील एक घटक असणाऱ्या सत्यजित भटकळ यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभास दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, आणि 'लगान'ची सर्व टीम उपस्थित होती. सत्यजितने 'लगान'सारख्या अभिजात अनुभवाची शिदोरी गाठीशी दिल्याबद्दल आमिर आणि आशुतोषचे आभार मानले. या पुस्तकाची मराठी आवृत्ती राजहंस प्रकाशनतर्फे तर हिंदी आवृत्ती पॉप्युलर प्रकाशनातर्फे लवकरच उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पारंपरिक भाषणादी कार्यक्रमाऐवजी लेखक सत्यजित भटकळ, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर

आणि स्वत: आमिर खान यांनी या पुस्तकातील निवडक उताऱ्यांचे वाचन केले. एका प्रश्नाच्या उत्तरात आमिर म्हणाला, 'चित्रपटाच चित्रीकरण होत असताना हा एक यादगार चित्रपट असेल असे वाटले नव्हते. लोकांना आवडेल याची खात्री होती, पण इतका प्रतिसाद मिळेल, असे वाटले नव्हते.' आशुतोषने या उत्तरात हस्तक्षेप करून सांगितले की, आता आम्हाला आम्ही काय काम केलं आहे, त्याची जाणीव हात आहे.

'लगान'ला ऑस्कर न मिळाल्याची काय कारणं असतील, अशा आशयाचे विविध प्रश्न येऊ लागल्यावर आमिरने 'मला या प्रश्नाचे विस्तृत उत्तर द्यायचे आहे' असं म्हणून एक छोटेखानी भाषणच केले. तो म्हणाला : ऑस्कर का मिळाले नाही, याची जो तो स्वत:च्या परीनं कारणं शोधत होता. कोट्यवधींचा आम्हाला पाठिंबा असताना काही जण मात्र नकारात्मक बोलत होते. त्या सगळ्यांना माझं एकच सांगणं आहे, मी माझ्या समाधानासाठी चित्रपट केला. तो आपल्या लोकांना आवडेल, असा मला विश्वास होता, त्याप्रमाणे तो सगळ्यांना आवडला म्हणून आम्ही ऑस्करच्या स्पर्धेत उतरण्याचा निर्णय घेतला. गाणी आणि चित्रपटाची लांबी या गोष्टींमुळे 'लगान'मागे पडला हे साफ खोटं आहे. 'नो मॅन्स लॅण्ड'हा एक अतिशय चांगला चित्रपट होता, म्हणून तो जिंकला आणि त्यात आपल्याला वाईट वाटण्यासारखे काय आहे, आपण आपल्या अपयशासाठी कारणं शोधायलाच हवीत का?

समारोपात तो म्हणाला : पुस्तकाने आमिर खान प्रॉडक्शनला एकही पैसा मिळणार नाही. सत्यजितने अतिशय चांगलं पुस्तक लिहिले आहे, मला ते आवडलं आणि म्हणून त्याच्या प्रकाशनात मी सहभागी झालो. कॉमिक बुक, मास्क आदी गोष्टी पूर्णपणे व्यापारी तत्त्वावर होत्या. या पुस्तकाचे तसे नाही.

## संत तुकारामांचे वारसदार आणि पेशवे यांच्या संबंधांवर प्रकाशझोत

पेशव्यांना तुकाराम महाराज किंवा त्यांचे वारसदार यांच्याविषयी ममत्व नव्हते, हा समज खोटा ठरविणारी कागदपत्रे पुण्याच्या पुराभिलेखागारात सापडली आहेत.

यापैकी एका पत्रात थोरले बाजीराव पेशवे यांनी, देशमुख देशपांडे यांना आदेश दिला आहे की, संत तुकारामांचे वंशज हरिभक्तपारायण राजर्षि उद्धव गोसावी यांच्या कार्यात अडथळा आणू नये. कोणी आणल्यास मुलाहिजा ठेवला जाणार नाही, हे ध्यानात ठेवावे.

दुसऱ्या एका पत्रात त्यांनी देहूगावच्या पाटलाला कळवले आहे की, खंडोबा गोसावी यांच्या म्हणण्याचा मान राखावा. बाळाजी विश्वनाथ यांनी देहूचे देवस्थान जागृत असून त्यास दोन खंडी जोंधळे व साडेचार मण तिळ पूजा व नंदादीप, तसेच नैवेद्यास द्यावे, असा आदेश १७०० साली काढला.

नानासाहेब पेशवे यांनी देहूगावच्या पाटलास धाडलेल्या आज्ञापत्रात म्हटले आहे की, तुम्ही सुरळीत वसुली देत नाही. तो खंडोबा गोसावी यांजकडे द्यावा. त्याआधीच्या आज्ञापत्रात गोसावी यांच्या शेतातील मोटा फाडिल्या त्या नीट करून द्याव्यात, असे कळवले होते.

महाराजांच्या वारसांमध्ये वाटणीच्या संदर्भात झालेला वादही नानासाहेबांनी सर्वांना एकत्र



बोलावून मिटवला आणि गावच्या पाटलांना कळवले की, गोसावीबाबा सांगतील ते ऐकावे. ही नोंद आहे २७ जानेवारी १७५०ची.

या घटनेच्या अर्धशतकानंतर दौलतराव शिंदे यांनी तुकारामांचे वारस बाळकृष्ण गोसावी यांना संत तुकारामांच्या पुण्यतिथीच्या खर्चास आपल्यातर्फे मौजे बेरडीर्ती पेडगाव व मौजे बोरीभडकर्ती सांडस ही दोन गावे इनाम म्हणून दिली होती.

शिवाजी महाराजांच्या मुलांनी, म्हणजे राजे संभाजी आणि राजाराम यांनीही, संत तुकारामांचा पुत्र राजर्षि नारोबा गोसावी हेही भागवतपारायण आहेत, असे म्हटले होते. त्यांनीच तुकोबापुत्र नारायण यांना दिलेल्या सनदेत, तुकोबा गोसावी सत्पुरुष भागवत कथा करीत असता अदृश्य झाले ही गोष्ट विख्यात आहे, एवढेच म्हटले आहे.

'भारत इतिहास संशोधक मंडळा'चे सभासद पांडुरंग बलकवडे यांना मोडी कागदपत्रांचा अभ्यास करत असताना हा पत्रव्यवहार सापडला आहे.

## वाढीव टपालखर्चामुळे ग्रंथविक्रीवर गदा

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात बुक-पोस्टच्या दरात वाढ करण्यात आल्यामुळे पुस्तकांच्या टपाली खर्चात भरमसाट वाढ होणार असून, आधीच रोडावलेल्या ग्रंथव्यवहाराला त्याचा फटका बसण्याची चिन्हे आहेत.

केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात २००२-०३ या सालासाठी सवलतीच्या बुकपोस्ट दरातही सध्याच्या दरापेक्षा तब्बल २०० ते १६०० टक्के इतकी वाढ केली आहे. इतके दिवस कोणतेही छापील पुस्तक हे सरसकट सामान्यत: दर २०० ग्रॅमला एक रुपया दराने पाठविता येत असे. म्हणजे साधारण अडीचशे-तीनशे पानांचे व दीडशे ते दोनशे किमतीचे पुस्तक सुमारे दोन रुपये स्टॅम्प व रजिस्ट्रेशनचे १७ रुपये मिळून १९ रुपये टपालखर्चात वाचकांच्या हाती पडत असे.

आता नवीन टपाल दर हे पुस्तकाच्या किंमतीशी निगडीत केले आहेत. त्यामुळे ५० रुपयांपर्यंतच्या पुस्तकांना १०० ग्रॅमला एक रुपया (पूर्वीच्या तुलनेत २०० टक्के अधिक) या दराने, ५१ ते २५० रुपये किमतीच्या पुस्तकांना १०० ग्रॅमना दोन रुपये (पूर्वीच्या तुलनेत ४०० टक्के ) या दराने आणि २५१ किंवा त्यापेक्षा अधिक किमतीच्या पुस्तकांना १०० ग्रॅमला आठ रुपये (पूर्वीच्या दराच्या तुलनेत १६०० टक्के) असा वाढीव टपालखर्च येणार आहे. थोडक्यात अडीचशे रुपयांच्या पुस्तकाला रजिस्ट्रेशन सोडून२५ रुपये टपालखर्च येणार आहे. 'महानायक'सारख्या कादंबरीला रजिस्ट्रेशनचा खर्च वगळूनही सुमारे १००रुपये इतका टपालखर्च पडेल. रजिस्ट्रेशनचा नवा दर २०रुपये होणार आहे. म्हणजेच ही कादंबरी टपालाने पाठविण्याचा खर्च १२०रुपये होईल. हे नवे दर बाहेरगावचे वाचक, वाचनालये, टपालाद्वारे शिक्षण घेणारे विद्यार्थी अशा सर्वांना न परवडणारे आहेत. शिवाय नव्या दरांचे वेगवेगळे टप्पे केल्याने वाद आणि गैरसमज वाढणार आहेत. अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांच्याशी या बाबतीत पत्रव्यवहार करण्यात येणार असून, सर्व ग्रंथप्रेमी व ग्रंथ ग्राहकांनी त्याचा पाठपुरावा करावा, असे आवाहन संघटनेने केले आहे. ही दरवाढ रद्द करण्याची घोषणा दि.२६एप्रिल रोजी करण्यात आली.

# जाहिरात



## गझलिया सुरेश भट यांच्या सत्तरीनिमित्त पुण्यात विशेष सोहळा

गझलची वेदना आणि सुगंध मराठीत आणणाऱ्या कविवर्य सुरेश भट यांच्या वयाच्या सत्तरीनिमित्ताने 'गझल सागर प्रतिष्ठान'तर्फे १५ एप्रिल रोजी पुण्यात एका सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. १५ एप्रिल रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र आणि नवभारत युवा आंदोलनाच्या सहकार्याने सह्याद्री सदनात गजल लिहिणाऱ्या व गाणाऱ्या नवोदितांसाठी कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी, संगीता जोशी, डी.एन.गांगण, दिलीप पांढरपट्टे, डॉ. अविनाश सांगोलेकर, राजेंद्र जोशी आणि भीमराव पांचाळे यांनी मार्गदर्शन केले. जुन्या-नव्या निमंत्रित शायरांच्या मुशायरामध्ये ए.के.शेख, श्रीराम पचिंद्रे, सदानंद डबीर, संदीप माळवी, सुलभा कामत आदी कवी सहभागी झाले. गजल सागर त्रैमासिकाच्या सुरेश भट विशेषांकाचे समाजसेवक निळू फुले यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

या कार्यक्रमात सुरेश भट मात्र प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणामुळे सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांच्या सन्मानार्थ त्यांच्या नागपुरातील निवासस्थानी जाऊन सत्कार करण्यात आला. संपर्क : श्रीमती संगीता जोशी, नवरंग, १८ डहाणूकर कॉलनी, सातवी गल्ली, कोथरुड, पुणे दूरध्वनी : ५४३०६१७/५४४३०८७

## 'कुसुमाग्रज विशेष' कार्यक्रमास रसिकांची दाद

गुढीपाडव्यानिमित्त पुणे येथे आयोजित 'कुसुमाग्रज विशेष'हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला... रसिकांची प्रचंड दाद मिळवून गेला.

'दुसरा पेशवा', 'कौंतेय' या नाटकांचे अभिवाचन, प्रेम, प्रेमयोग, याचक या कवितांचे वाचन, अपंग बालकलावंतांनी सादर केलेले 'नटसम्राट' अशा चढत्या भांजणीने रंगत गेलेल्या 'उत्तुंग'या कार्यक्रमात कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या विविध माध्यमांतील कारकीर्दीचा आढावा घेण्यात आला. 'इंडियन मॅजिक आय' व 'महफिल केटरर्स' यांनी साहित्य, कलाक्षेत्रातल्या एखाद्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या कलाकृतीचे रसग्रहण करीत त्याच्या कर्तृत्वाला अभिवादन करायच्या उद्देशाने गेल्या तीन वर्षापासून 'उत्तुंग विशेष'या कार्यक्रमास सुरवात केली. त्यामध्ये पु.ल.देशपांडे, प्र.के.अत्रे, ग.दि.माडगूळकर या मान्यवरांबरोबरच यंदा कुसुमाग्रज ऊर्फ वि.वा.शिरवाडकर यांच्यावरील कार्यक्रम सादर झाला.

त्यात कुसुमाग्रजांनी लिहिलेले पहिले स्वतंत्र नाटक 'दुसरा पेशवा' या बरोबरच गाजलेले 'कौंतेय' या नाटकातील प्रसंग, जीवनावर भाष्य करणाऱ्या 'प्रेम', 'प्रेमयोग', 'गाभारा', 'कणा', 'पळस' आदी कवितांचे वाचन, चित्रपटाच्या क्षेत्रात अयशस्वी झाल्याच्या अनुभवावरील 'प्रभातस्वप्न आमचंही'या विनोदी कथेचे वाचन, 'म्यानातून उसळे तलवारीचे पात', 'हे सुरांनो चंद्र व्हा', 'मी तुला काय वाहू'या कवितांचे बहारदार सादरीकरणही झाले.

कुसुमाग्रज लिखित मराठी रंगभूमीवरील मानदंड 'नटसम्राट'या नाटकातील एक प्रसंग प्रिझम फौंडेशनच्या लार्क या विशेष शाळेतील अजित कुंटे, प्रियांका खोमणे, श्रुती ढावरे व सौरभ गुटाळ या चार अपंग बालकलावंतांनी सादर केला, तेव्हा तर रसिकांनी त्याला प्रचंड दाद दिली. सुमारे पाच तास चाललेल्या या कार्यक्रमात कला क्षेत्रातील श्रीकांत मोघे, किशोर कदम, विजय कदम,

रमेश भाटकर, तुषार दळवी, पराग वाघमोडे, शैला मुकुंद, मधुरा डहाणूकर, निखिल रत्नपारखी, पौर्णिमा मनोहर, सुनील अभ्यंकर, शुभांगी दामले यांच्या बरोबरच शौनक अभिषेकी, अनुराधा मराठे, अंकिता देवळे या गायकांनीही त्यात भाग घेतला. शांभवी वझे यांच्या नृत्यांनाही रसिकांनी प्रतिसाद दिला. श्रीरंग गोडबोले यांची निर्मिती संकल्पना होती. तर अजित भुरे, पौर्णिमा मनोहर यांनी त्याचे दिग्दर्शन केले होते. डॉ. सलील कुलकर्णी यांनी संगीत दिले.

## महाराष्ट्रात वाङ्मयीन संस्कृती रुजलेली नाही

महाराष्ट्र हा मर्दाचा देश आहे. देशभक्तांचा आणि पंडितांचा देश आहे या समाजामध्ये विविध कला आणि वाङ्मय सांस्कृतिक स्तरावर रुजले नाही, अशी खंत विख्यात समीक्षक डॉ. द.भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केली. २० मार्चला मर्ढेकर स्मृतिदिनानिमित्त नागपूर येथे 'प्रास'ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षपदावरून बोलताना द.भि.पुढे म्हणाले, अशी वाङ्मयीन संस्कृती मराठी मनात आणि समाजात रुजावी यासाठीच ग्रंथप्रकाशन, स्मृतिदिन इत्यादी उपक्रमांची आवश्यकता असते.

प्रतिभा ही उन्नत मानसशक्ती आहे. मनोरुग्ण, आत्मकेंद्रित, दु:खी आणि कुठल्या तरी एकाच मानसिक ऊर्जेचा वापर करून पुनरावृत्त जीवन जगत असतो तर प्रतिभावंत व्यक्तिगत अंतर्मन, सामूहिक अंतर्मन, जाणीव तर्कसंगती, साहचर्य संगती, लयसंगती, आकांक्षा, सहजप्रवृत्ती, भावना, ज्ञान इत्यादी असंख्य ऊर्जांचा एकाग्र आणि उत्कट उपयोग करून अनुभवांचे नवनवे व्यूह उभारीत असतो- मनोरुग्णाला हे शक्यच नसते. 'कवी' या शब्दाचा अर्थ 'ज्ञानी'असा आहे. प्लेटोने मात्र 'कवी वेडे असतात. त्यांना आदर्श राज्यात स्थान नाही.'असे म्हटले. स्वच्छंदवादाच्या काळात कवीच्या 'वेडेपणा'वर आणखी जोर देण्यात आला. म्हणूनच अनेक अभ्यासकांनी रोमॅण्टिक काव्याला 'हॉस्पिटल पोएट्री'म्हटले. कवी मर्ढेकरांनी माधव जूलियन-यशवन्त-गिरीश यांच्या काव्याविरुद्ध बंड पुकारले ते याच भावनेने.

अनिल-मर्ढेकर-मुक्तिबोध हे निरोगी मनोवृत्तीचे अस्सल कवी होते. ज्ञानेश्वर-तुकाराम, केशवसुत-तांबे या थोर कवींकडे पाहिले की, प्रतिभा ही मनोव्याधी नसून ती एक महान शक्ती आहे याची खात्रीच पटते. मनोरुग्ण हा विध्वंसक असतो तर प्रतिभावंत नवनिर्माता. यांच्यातील भेदही विस्ताराने उकलून दाखविला. प्रतिभा आणि प्रतिभावंत यांचे स्वरूप आणि वैभव काय असते हे पाहावयाचे असल्यास प्रत्येक साहित्यिकाने 'वाङ्मयीन महात्मता' या मर्ढेकरांच्या दीर्घ निबंधाचा मनोभावे अभ्यास करावा. तो मराठीतील अद्वितीय समीक्षालेख आहे. असेही द.भि. म्हणाले. अलीगढचे मराठीचे प्राध्यापक व कवी डॉ. श्रीनिवास सिरास यांनी म्हटले : 'कवितेने आपल्याला आयुष्यभर साथ दिली. तिच्या निर्मितीमागे कुठलेही व्यावहारिक प्रयोजन नाही तर ते आपले आतले जगणे आहे.' द.भि. यांनी दिलीप चित्रे यांच्यानंतरचा कवी असा डॉ.सिरासांचा गौरवकेला.

## समाजाला सावरण्यासाठी संत विचारांची आज गरज

''अलीकडे धार्मिक व जातीय तणावांमुळे विकृत झालेल्या समाजाला सावरण्यासाठी संत विचारांची गरज आहे.'' असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अशोक कोळस्कर यांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या 'संत एकनाथ - एक समग्र अभ्यास' या पुस्तकाच्या



प्रकाशनप्रसंगी व्यक्त केले. एकनाथ षष्ठीनिमित्त पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'संत एकनाथ- एक समग्र अभ्यास' या पुस्तकांचे संपादक व संत नामदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ.अशोक कामत म्हणाले, ''भूतदया, जातिधर्मविरहित समाजरचना यांसारखी आजच्या काळात राज्यघटनेने मान्य केलेली मूल्ये संत एकनाथ स्वत: जगले. त्यांची शिकवण सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचावी, यासाठी 'संत एकनाथ'या पुस्तकाचा प्रपंच करण्यात आला आहे.''

डॉ.प्र.ल.गावडे यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला.

ॲड. व.रा.पिंगळे यांनी स्वागत केले. प्रतिभा धडफळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. श.वा.दामोदरे यांनी आभार मानले. ॲड.मकरंद देव यांनी सूत्रसंचालन केले.

## 'नाटक अजून उत्पादन झालेलं नाही.'

'ग्राहकाला हवं तसं उत्पादन' अशी दृष्टी मराठी नाट्यव्यवसायात अजून तरी शिरलेली नाही, असा समाधानाचा सूर 'मराठी नाटकांकडून या तरुण पिढीला हवंय तरी काय?' या परिसंवादात व्यक्त झाला. सूत्रसंचालक अशोक शेवडे यांच्याच शब्दांत सांगायचे झाले, तर भावी काळात नाट्यसंमेलनाध्यक्ष होऊ शकतील असे पुरुषोत्तम बेर्डे, शरद उपाध्ये, लक्ष्मीकांत बेर्डे, निर्मिती सावंत, प्रा. अनिल सोनार आणि देवेंद्र पेम यांनी परिसंवादात भाग घेतला.

'मुळात मी रंगभूमीचा माणूस नाही.' अशी सुरवात करीत 'राशिचक्र'कार शरद उपाध्ये यांनी ज्योतिषशास्त्राचे वर्ग, त्यातील व्याख्यानांच्या जोरावर सुरू केलेले प्रयोग आणि कालांतराने येणारे प्रेक्षक लक्षात घेऊन केलेले बदल याची कल्पना दिली.

मच्छिंद्र कांबळी यांनी 'सगळा प्रेक्षक माझा अन् मी सगळ्यांचा' अशा मार्मिक शब्दांत आपली भूमिका मांडली. 'ऑल द बेस्ट' फेम देवेंद्र पेम यांनी प्रेक्षकांच्या जाणिवेपेक्षा विषय, आशय महत्त्वाचा वाटल्याचे सांगितले. दिग्दर्शकाच्या दृष्टीतून नाट्यनिर्मितीचे सूत्र बांधणारे पुरुषोत्तम बेर्डे यांचाही 'नाटक सगळ्यांनाच अपील व्हावे'हा हेतू लक्षात आला. लेखक प्रा.अनिल सोनार यांनी सांगितले,की चांगला कलावंत हा प्रामाणिक असतो. त्याला जेव्हा सांगायचं असतं तेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर कोणताही 'ग्राहक-प्रेक्षक'नसतो. जोरात चाललेल्या 'जाऊबाई' निर्मिती सावंत यांनीही इतरांच्याच सुरात सूर मिसळला होता. लक्ष्मीकांत बेर्डे यांनी अगदी मिश्किलपणे सांगितले, की प्रेक्षक असतो ना, हे महत्त्वाचे. समीक्षेमुळे एखादा प्रेक्षकवर्ग नाटकांपासून दुरावला जातो, हे विधानही सर्वांनी खोडून काढले. पुरुषोत्तम बेर्डे, लक्ष्मीकांत बेर्डे, आणि देवेंद्र पेम यांनी 'आजचे तरुण समीक्षणे किती वाचतात?' हा प्रश्न उपस्थित करीत हल्लीच्या तरुण वर्गात वाढत चाललेली नाटकाची ओढ लक्षात आणून दिली. मच्छिंद्र कांबळी आणि शरद उपाध्ये यांनी समीक्षा नव्हे, तर 'माऊथ पब्लिसिटी' तरुणांमध्ये नाटकाची आवड निर्माण करते, असा मुद्दा उपस्थित केला.

## महात्मा फुले यांच्या माणसाचा विचार कालातीत

महात्मा फुले यांनी समग्र माणसाचा विचार काळाच्या मर्यादा ओलांडून केला. कृतिशील फुलेवाद्यांची वानवा असलेल्या समाजात हाच विचार बिंबविण्याची गरज आहे. या विचारांचा इतर भाषेत अनुवाद झाला असता, तर देशातील पुरागामी विचारांची व्यापकता वाढली असती, असे

प्रतिपादन ‘सकाळ’चे संपादक उत्तम कांबळे यांनी नाशिक येथे केले.

कॉम्रेड नरेंद्र मालुसरे चॅरिटेबल संस्था व लेफ्ट वर्ड बुक्सतर्फे प्रा.गो.पु देशपांडे यांच्या ‘महात्मा फुले यांचे निवडक लिखाण’या पुस्तकाचे प्रकाशन श्री.कांबळे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

श्री. कांबळे म्हणाले, की सध्या माणसाचे अवमूल्यन आणि चंगळवादाचे वैश्विकीकरण सुरू आहे. त्याच जोडीला माणसं जाळून मारण्याची क्रूर पद्धत अलीकडच्या काळात आली आहे. अशा एका निराळ्या काळात महात्मा फुले यांच्या विचारांचे वैश्विकीकरण करण्याचा प्रयत्न प्रा.गो.पु.देशपांडे यांनी केला आहे. ते चळवळीच्या बळकटीकरणात योगदान देईल.

साहित्य, चळवळी व विचाराच्या क्षेत्रात साचलेपणा आला आहे. त्यावर उपाय आणि नवे वारे वाहावेत म्हणून महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे या तिघांचे कर्तृत्व पुन्हा एकदा नव्याने वाचण्याची, अभ्यासण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, असे प्रा. देशपांडे यांनी सांगितले.

ते म्हणाले, की महात्मा फुले यांच्या लेखनाचा हा पहिला अनुवाद नाही. यापूर्वी असाच प्रयत्न झाला आहे. मुळातच, अनुवाद करणे म्हणजे, त्यांच्या विचाराला भिडण्यासारखे आहे. त्यातूनच विचारवंत उलगडतात. शिवाय विचार पुढे जाण्यासाठी माझ्या अनुवादावर विचार व्हायला हवा. प्रसंगी टीकादेखील व्हायला हवी.

मराठी भाषेत महात्मा फुले यांचा आसूड ओढण्याची हिंमत आहे. हा आवाज इंग्रजीत आणणे अवघड आहे. महात्मा फुले यांचे काही शब्दसुद्धा हाती लागत नाहीत. मी ‘सत्यशोधक’ हे नाटक लिहिल्यानंतर फुलेंचे साहित्य वाचत गेलो आणि एकविसाव्या शतकाच्या महाराष्ट्रात अडकलो, असेही त्यांनी सांगितले.

## संमेलनाध्यक्षपदी भुजंग मेश्राम

उनकेश्वर येथे होणाऱ्या फुले आंबेडकरी आणि आदिवासी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक भुजंग मेश्राम यांची निवड करण्यात आली आहे.

बहुजन विचार प्रबोधन परिषदेतर्फे ११ आणि १२ मे रोजी हे फुले आंबेडकरी आणि आदिवासी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असून, उनकेश्वर येथील राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मेश्राम यांच्या वैचारिकतेचा गावाकडील लोकांनी केलेला उत्स्फूर्त सन्मान असल्याची गावकऱ्यांची भावना आहे.

## मर्ढेकरांनी साहित्यसंस्कृतीचा तिसरा डोळा उघडला.

बा.सी.मर्ढेकरांनी मराठी वाङ्मय संस्कृतीचा तिसरा डोळा आपल्या काव्यप्रतिभेद्वारे उघडला असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार डा्. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी नागपूर येथे केले. विदर्भ साहित्य संघातर्फे बा.सी.मर्ढेकर स्मृतिदिन कार्यक्रमाला डॉ.विश्वास कानडे व प्रा. अनंत सूर हेही उपस्थित होते.

डॉ.जोशी म्हणाले की, मर्ढेकरांची कविता समजून घेण्याआधी भारतीय वर्ग चरित्र समजावून घेतले पाहिजे. ज्या काळात त्यांना काव्यनिर्मिती केली तो काळ, तो समाज त्यांना बाहेरचा मानत



होता. हे बाहेरचे पण नव्हते तर त्यांनी मानवी संवेदनेकडे बघण्याचा तिसरा पेत्र समाजाला देऊ केला होता. त्यांनी कवितेलाच नव्हे तर समीक्षेला, समाजाला दिलेली ही नवी दृष्टी होती. एक नवी संवादवृत्ती, संवाददृष्टी त्यातून निर्मित झाली. हा संवाद ज्या अंतर्द्वंद्वातून आला, ज्या दुभंगातून आला तो दुभंग त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील नव्हता तर समग्र मानवतेच्या दुभंगाची ती जाणीव होती.

डॉ.कानडे म्हणाले, मर्ढेकरांची कविता अभ्यासताना काही प्रश्न उभे राहतात. मर्ढेकरांची कविता शिकविताना इतिहास, भूगोलासारखाच माहितीचा विषय शिकविला व शिकला जातो आहे, अशी धारणा असते. मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने हे फारसे उपयुक्त नाही. वाङ्मय शिकविण्यात व शिकण्यात आस्वादक्षमता असावी लागते. आस्वादक्षमतेसोबत संवेदनशीलताही येते. मर्ढेकरांच्या कवितबाबत विचार करताना संवेदनशीलता अधिक महत्त्वाची ठरते.

## तुकारामांचे अभंग जगभर पोचण्याची गरज

दया, सहानुभूती, आत्मविश्वास व मानवतेची थोर शिकवण देणारे तुकारामांचे अभंग आज जगभर पोचवण्याची गरज आहे, असे मत केंद्रीय अर्थ राज्यमंत्री बाळासाहेब विखे-पाटील यांनी व्यक्त केले.

तुकाराम बीजेचे औचित्य साधून देशभक्त बाळासाहेब भारदे इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी व महाराष्ट्र बँकेच्या वतीने संत तुकारामांची गाथा संगणकावर आणण्याच्या प्रकल्पाचा प्रारंभ विखे पाटील यांच्या हस्ते झाला. या प्रकल्पाचे प्रमुख ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ विजय भटकर, ज्येष्ठ विचारवंत बाळासाहेब भारदे, महाराष्ट्र बँकेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक एस.सी. बसू आदींची या वेळी भाषणे झाली.

तुकारामांची गाथा जगाला परिचित व्हावी या हेतूने इंटरनेट आवृत्ती तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामध्ये चार हजार ९२ अभंग असून मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमध्ये त्यांचे भावार्थ दिसतील. यासाठी संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. पहिल्या पानावर तुकारामांचे चरित्र, आरती, पूजा, त्यांच्यावर निघालेले चित्रपट आदींचा समावेश आहे. महाराष्ट्रातील ६४ संतांच्या साहित्याची माहितीही त्यातून मिळणार आहे. सीडीमध्ये गोष्टीरूप तुकाराम व अभंगांचाही समावेश आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र बँकेने पंधरा लाख ९८ हजार रुपये दिले आहेत.

श्री.विखे-पाटील म्हणाले, ‘‘समाजातील असंघटित वर्गाला एकत्र आणण्याचे मोठे काम वारकरी संप्रदायाने केले आहे. तुकारामांचे अभंग हतबल माणसांना उभारी देणारे व त्यांच्यात विश्वास निर्माण करणारे ठरले आहेत. आज द्वेष, मत्सर, स्वार्थ यांच्या पलीकडे लोकांना काहीही दिसत नाही. जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे हे अभंग समाजाला उपयुक्त ठरतील.’’

जीवनाचा खरा अर्थ तुकारामांनी सांगितला. त्यांचे तत्त्वज्ञान, महान मानवतावाद लोकांसमोर येण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम हाती घेतल्याचे श्री. भटकर यांनी सांगितले.

## अमृतमहोत्सवी द.मा.मिरासदार

मराठीचे प्राध्यापक, नामवंत ग्रामीण कथालेखक, उत्तम कथाकथनकार आणि चित्रपटकथा, पटकथा व संवादलेखक अशा चौफेर कामगिरीने मिरासदार यांनी १४ एप्रिल रोजी आपली पंचाहत्तरी पूर्ण केली. पंढरपूर येथे मिरासदार वकिलाच्या घरी जन्मलेल्या द.मा.यांनी वडिलांकडे

आलेल्या नमुनेदार अशिलांच्या कथा आणि घटना आपल्या कथांमध्ये घेतल्या आणि मराठी ग्रामीण कथांमध्ये वेगळे दालन उघडले. खेड्यांत राहणारा माणूस पिचलेला, दारिद्र्याने गांजलेला, परिस्थितीला दबून राहणारा असतो. आणि त्याला व्यवहार तर अजिबात समजत नाही. हा समज पूर्णपणे खोटा पाडण्याचे काम द.मा.यांच्या या व्यक्तिरेखांनी केले. खेड्यात चावडीवरल्या गप्पांना महत्त्व असते. तेथे गावकुचाळक्या चालतात. थापेबाजी चालू होते. ही थापबाजी करणारे गावकरी रंगविण्यात मिरासदारांना रस आहे. द.मा. यांच्या कथांमधून इब्लिस व्यक्तिरेखा भेटतात. मिरासदार स्वत: गप्पांचा फड रंगविणारे गोष्टीवेल्हाळ रसाळ निवेदक आहेत. पूर्वी साहित्य संमेलनांमधून कथाकथन असे. त्यात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि द.मा.मिरासदार हे तिघे हटकून असत. औरंगाबाद आणि नंतर पुण्यात मराठीचे प्राध्यापक म्हणून नाव कमावलेल्या मिरासदार यांनी कथालेखकापाठोपाठ मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश करून पटकथा आणि संवादलेखनाच्या क्षेत्रात बाजी मारली. गदिमांनंतर संवादलेखनाची उणीव भासत असतानाच शंकर पाटील आणि मग द.मा.मिरासदार यांनी मोहोर उमटविली. पंधरा-वीस पुस्तके व त्याला मिळालेली रसिक आणि राजमान्यता, कथाकथनाचे हजारो प्रयोग आणि हुकमी पटकथालेखक म्हणून चौफेर कामगिरी केलेल्या मिरासदार यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यामानाने उशिराच मिळाले. गोष्टीवेल्हाळपणा, रंजक चुटके सांगून वाचकांची घटकाभर करमणूक करणे, दोन घटका वाचकांना त्यांच्या चिंता विसरायला लावणे, हाच मिरासदारांच्या कथांचा रंजनप्रधान हेतू असतो. त्यांना खेड्यांतले दारिद्र्य, फरफट पाहिली, पण रंगवली नाही. अज्ञानामुळे ग्रामीण माणसाची परवड अधिक होते, याची जाणीव त्यांना असल्यानेच या अज्ञानातून निर्माण होणारा विनोद त्यांना आकर्षून घेतो. शेराला सव्वाशेर अशी माणसे रंगविण्यात मिरासदारांचा हात कोणी धरणार नाही. असली सव्वाशार माणसेच तुम्हाआम्हाला शहाणे करून सोडतात. मिरासदारांनी मराठी वाचकाला असेच शहाणे करून सोडताना पंचाहत्तरी केव्हा पूर्ण केली, हे कळलेच नाही.

## दहा अव्वल मराठी पुस्तके

मराठी साहित्यातील आगळेवेगळे स्थान निर्माण करणाऱ्या दर्जेदार पुस्तकांची ओळख देशभरातील साहित्यरसिकांना व्हावी, या उद्देशाने राज्य मराठी विकास संस्थेने मराठीतील दहा निवडक पुस्तकांचा हिंदी अनुवाद केला आहे. या हिंदी अनुवादित पुस्तकांचे प्रकाशन गेल्या सोमवारी चित्रपटसृष्टीतील सर्जनशील दिग्दर्शक व साहित्यिक गुलजार यांच्या हस्ते व मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईत १५ एप्रिलला झाला.

मराठी पुस्तकांचा हिंदी अनुवाद करण्यात आलेले ग्रंथ पुढीलप्रमाणे : 'करुणाष्टक'- व्यंकटेश माडगूळकर, 'माचीवरला बुधा'- गो.नी. दांडेकर, 'टिकलीएवढं तळं'- निर्मला देशपांडे, 'कल्याणी'- ज्योत्स्ना देवधर, 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे'- माधव कोंडविलकर, 'दिवसेंदिवस'- शं.ना.नवरे, 'एका श्वासाचे अंतर' - अंबिका सरकार, 'श्रीमती रमाबाई रानडे : व्यक्ती आणि कार्य'- मा.श्री.विद्वांस, 'मी भरून पावले आहे'-मेहरुन्निसा दलवाई, 'रोहिणी' - केशव केळकर.

देशभरातील साहित्य रसिकांना कमी किंमतीत मराठी साहित्यातील उत्तम दर्जेदार ग्रंथांची ओळख हिंदी अनुवादित पुस्तकांच्या प्रकाशनाने करून देण्याच्या राज्य सरकारच्या प्रोत्साहनाने हा पहिलाच प्रयत्न असल्याचे राज्य मराठी विकास संस्थेच्या प्रभारी संचालिका श्रीमती वसुंधरा पेंडसे



नाईक यांनी सांगितले.

अनुवादित पुस्तकांच्या प्रकाशनाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री म्हणाले, ''मराठी साहित्य हिंदीमध्ये फारसं अनुवादित होत नाही, त्यामुळे ते दिल्लीपर्यंत पोहचत नाही. परिणामी मराठी लेखकांना साहित्य अकादमीच्या पुरस्कारांमध्ये मोठं स्थान नसतं, असा एक सूर व्यक्त केला जातो. परंतु त्या पुस्तकांच्या अनुवादांना प्राधान्य दिलं तर हे नवीन प्रकारचं व्यासपीठ निर्माण होईल.''

गुलजार म्हणाले,''अनुवादक हे एका ज्योतीने दुसरी ज्योत उजळीत जाण्याचं काम करत असतात. कुठलीही एक भाषा येण्याने समग्र भारतीय साहित्याचं आकलन होणं कठीण आहे. इतर भाषांमधल्या साहित्याचीही ओळखं होणं त्यासाठी आवश्यक ठरतं. मराठीतले ज्ञानेश्वर, कुसुमाग्रज, पु.ल. जर मी वाचले नसते तर माझंही ज्ञान अपुरंच राहिलं असतं.''

सांस्कृतिक कार्यमंत्री रामकृष्ण मोरे म्हणाले की, माणसाची सांस्कृतिक भूक मोठी आहे. नव्या युगातही वृत्तपत्रं आणि ग्रंथांचे महत्त्व अबाधित राहणार आहे. काय चांगलं आहे हे जाणणारा मोठा वर्ग या राज्यात आहे. त्यांचा लाभ सरकारी संस्थांनी घ्यायला हवा. राज्य मराठी विकास संस्थेच्या प्रभारी संचालिका वसुंधरा पेंडसे नाईक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या वेळी शं.ना.नवरे, श्रीमती निर्मला देशपांडे, अंबिका सरकार, मेहरुन्निसा दलवाई या लेखक-लेखिकांचा व सर्व अनुवादकांचा सत्कार करण्यात आला.

## नाट्यपंढरीच्या पाऊलखुणा

सांस्कृतिक विभाग मंत्रालय मुंबई आणि देवगंधर्व बखलेबुवा ट्रस्ट पुणे यांच्या वतीने नाट्यपंढरीच्या पाऊलखुणा या ध्वनिचित्रफितीत जुन्या संगीत नाटकांपैकी २३ नाटके आणि त्यातील ३४ प्रवेशांचा समावेश केला आहे. एकूण ८ तासांची ही ध्वनिफीत शासनाकडे सुपूर्द करण्यात आली.

या प्रसंगी बोलताना सांस्कृतिक कार्यमंत्री रामकृष्ण मोरे म्हणाले, 'मराठी संगीत रंगभूमीचा इतिहास केवळ ग्रंथरूपात माहिती होऊन उपयोगाचा नाही. यातला अभिनय, त्या काळच्या संगीत रंगभूमीचं वैभव लोकांपुढे यावं म्हणून हा सांस्कृतिक ठेवा जपण्याचे काम शासनाचे आहे. एकाच नाटकाचे चित्रीकरण करण्यापेक्षा वेगवेगळ्या संगीत कंपन्या, त्यातले संगीतकार त्यांचा प्रत्येकाचा बाज निवडून प्रवेश सादर करावेत असं ठरवलं. शासन स्वत: हे काम करू शकत नाही. कारण ते दर्जेदार होईल याची खात्री नाही म्हणून याआधी दीनानाथ मंगेशकरांवर 'स्वर मंगेश' आणि देवगंधर्व असे कार्यक्रम करणाऱ्या देवगंधर्व बखलेबुवा ट्रस्टकडे हे काम सोपवण्यात आले.'

या प्रसंगी ज्येष्ठ कलावंत आणि यंदाचे व्ही.शांताराम पुरस्कार विजेते कलावंत चंद्रकांत गोखले, राजेंद्र बनहट्टी, सांस्कृतिक कार्य सचिव गोविंद स्वरूप, महापौर दीप्ती चौधरी आदी उपस्थित होते.

१८८०च्या शाकुंतलपासून सौभद्र, मृच्छकटिक शारदा, मानापमान, विद्याहरण, संशयकल्लोळ ते १९७२ सालच्या स्वरसम्राज्ञी नाटकातले प्रवेश चित्रित करण्यात आले आहेत. स्वरराज छोटा गंधर्व, जयराम शिलेदार यांच्या मृच्छकटिक आणि मानापमान नाटकातील दुर्मिळ ध्वनिचित्रफितींसह शरद तळवळकर आणि भक्ती बर्वे यांनी साकारलेल्या संशयकल्लोळमधील दुर्मिळ ध्वनिचित्रफितीही पाहायला मिळाल्या. या कार्यक्रमाला मा.अविनाश भालचंद्र पेंढारकर, चंद्रकांत गोखले, जयमाला

शिलेदार, कीर्ती शिलेदार, चित्तरंजन कोल्हटकर, डॉ.श्रीराम लागू इत्यादी कलावंत हजर होते. आठ तासांच्या या ध्वनिचित्रफितीत जुने गाजलेले कलावंत त्यांच्या त्या भुमिकेत पाहण्याचा योग रसिकांना आला. गडद रंगभूषा करूनही न लपणारे वाढलेले वय या कलावंतांनी आपल्या अभिनयाने आणि आवाजाने विसरायला लावले. महाराष्ट्र शासनाचा हा प्रयत्न स्तुत्य असला तरी या ध्वनिचित्रफितीची संहिता, लेखन-दिग्दर्शन या गोष्टी अगदीच ढोबळ आहेत. तरीही जुने स्मृतिधन जपण्याचा हा उपक्रम नक्कीच अभिनंदनीय आहे. ही ८ तासांची ध्वनिचित्रफित अवघ्या ६ लाख रुपयांत तयार करण्यात आली आहे. रामकृष्ण मोरे यांनी महाराष्ट्रातील लावणी संदर्भात अशीच ध्वनिचित्रफित तयार करण्यात येईल असे जाहीर केले.

**बालकांड**

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे ल.ग.जोग स्मृतीप्रीत्यर्थ ह.मो.मराठे लिखित बालकांड या पुस्तकावर चर्चासत्र आयोजित केले होते. दादरच्या सुरेंद्र गावस्कर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ होते तर अंजली कीर्तने, माधवी चाफेकर, विवेक जोग आणि लेखक ह.मो.मराठे उपस्थित होते.

'लेखकाने पुस्तके लिहिताना आपल्या जीवनातील अनुभव उघड केले तरच त्यातून चांगली साहित्यकृती निर्माण होते. ह.मो.मराठेंनी 'बालकांड'मध्ये तसा प्रयत्न केल्याने एक चांगली साहित्यकृती निर्माण झाली आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांनी केले.'

'बालकांड'मध्ये लेखकाने तटस्थपणे केलेले व्यक्तिचित्रण, वापरलेली चितपावनी ब्राह्मणी भाषा आणि नाविन्यता ही पुस्तकाची वैशिष्ट्ये असल्याचे माधवी चाफेकर यांनी सांगितले.

ह.मो.मराठे यांनी 'बालकांड'ची प्रस्तावना कुणाला दुखावण्यासाठी नसल्याचे स्पष्ट केले, आजच्या जातीय विद्वेषाकडे आपला रोख असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

पुस्तकात कोणत्याही अनुभवाचं विश्लेषण लेखक करीत नसल्याने पुस्तकाची अर्थसधनता वाढत जाते, असं मत अंजली कीर्तने यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्ज्वला मेहेंदळे यांनी केले.

**पुस्तक प्रदर्शनामुळे वाचक वर्गाची व्यापकता वाढीस लागेल - मुख्यमंत्री**

राज्य मराठी विकास संस्था व नवनीत पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लोकसत्ता पुस्तक मेळ्या'मुळे ग्रंथालय चळवळीत वाढ होऊन वाचक वर्गाची व्यापकता वाढणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केले.

राज्य मराठी विकास संस्था व नवनीत पब्लिकेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकसत्ता पुस्तक मेळ्या'चे आयोजन एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. यात सर्व प्रकारची शासकीय प्रकाशने सहभागी झाली होती. सांस्कृतिक कार्यमंत्री रामकृष्ण मोरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तर प्रसिद्ध कवी व साहित्यिक गुलजार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सरकारी खात्याच्या बाहेर पडून लोकराज्य नव्या रूपात वाचकांसमोर येत आहे, असे सांगून मुख्यमंत्री आपल्या भाषणत पुढे म्हणाले की, प्रत्येक महसूल विभागात अशा प्रकारची पुस्तक प्रदर्शने भरविली पाहिजेत. अशा प्रदर्शनांना शासन भरघोस मदत करील. त्यामुळे वाचकांना शासकीस



योजना, शासकीय उपक्रम व निर्णय यांची परिपूर्ण माहिती मिळेल. या प्रदर्शनात विविध विषयांवर असलेल्या पुस्तकांमुळे वाचकांना अनेक गोष्टी ज्ञात होणार आहेत.

१०वी उत्तीर्ण झाल्यानंतर काय करावे, आरोग्यविषयक माहिती अत्यंत सोप्या शब्दात या पुस्तकांत समाविष्ट आहे.

नवनीत पब्लिकेशन्सचे गाला व लोकसत्ताचे संपादक डॉ.अरुण टिकेकर यांचा याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला. या प्रदर्शनास केलेल्या विशेष सहाय्याबद्दल प्रा.रामकृष्ण मोरे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

## नवी स्पर्धा

**गाळलेल्या जागा भरा व जोड्या जुळवा.**

खालील दोन गटांपैकी एका गटात पुस्तकांची नावे व एका गटात लेखकांची नावे दडलेली आहेत. ती शोध व पुस्तक व लेखकांच्या योग्य जोड्या जुळवा.

अ गट

१) सां □ □ से  □ ट □  □ □ न

२) बि □ □ स  □ हा □ □

३) □ न  □ □ डा □  □ ल

४) □ अ □  □ ज  □ की

५) उ □ □  □ द □  □ व □ □ □

ब गट

१) □ म □  □ रे

२) अ □ □  पा □

३) अ □ □  □ न


४) ना □ □ □ □ □ □ प □

५) शा □  □  □ □ के

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीचे प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.

**मुदत १५ एप्रिल २००२ पर्यंत**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.




## कृष्णवर्णीय लेखिकेला प्रथमच पुलित्झर

साहित्यक्षेत्रात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुलित्झर पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून या पुरस्काराच्या इतिहासात प्रथमच एका कृष्णवर्णीय लेखिकेला नाटकासाठी हा पुरस्कार मिळाला आहे.

सुझान लोरी पार्क्स (३८) असे या कृष्णवर्णीय नाटककाराचे नाव असून टॉपडॉग/अंडरडॉग असे या द्विपात्री नाटकाचे नाव आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष फ्रेडी टुमन यांच्यावर लिहिलेल्या टुमन या पुस्तकासाठी १० वर्षांपूर्वी पुलित्झर पुरस्कार पटकावणारे इतिहासकार डेव्हिड मॅक्युल्लॉ यांना अमेरिकेचे अध्यक्ष जॉन ॲडम्स यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकासाठी यंदा दुसरा पुलित्झर मिळाला आहे.

हा खरोखर आमच्यासाठी महत्त्वाचा क्षण आहे आणि आमच्यासाठी म्हणजे केवळ अमेरिकन-आफ्रिकन महिला नाटककारांसाठी नव्हे तर माझ्या या नाटकाशी संबंधित असणाऱ्या प्रत्येकासाठीच ही महत्त्वाची घटना आहे, अशी प्रतिक्रिया पार्क्स यांनी दिली आहे. ऑफ ब्रॉडवे या ना नफा तत्त्वावरील थिएटरमधील आपल्या कार्यालयातून पुलित्झर मिळाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यात याच थिएटरमध्ये त्यांच्या नाटकाचा पहिला प्रयोग झाला होता.

मॅक्युल्लॉ (६८) यांनीही पुलित्झर मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ललित साहित्य विभागात रिचर्ड रुसो यांना 'एम्पायर फॉल्स' या पुस्तकासाठी पुलित्झर घोषित झाले आहे. संगीताचा पुलित्झर पुरस्कार ८८ वर्षांच्या हेन्री ब्रँट यांना 'आइस फिल्ड'साठी मिळाला आहे.

पत्र, नाटके व संगीत यासाठी फक्त अमेरिकन नागरिकांनाच पुलित्झर पुरस्कार देण्यात येतात. अमेरिकेच्या इतिहासावरील साहित्यासाठी मात्र कोणत्याही देशाच्या नागरिकाला हा पुरस्कार देण्यात येतो.

## 'गटुळं'ला आशिर्वाद पुरस्कार जाहीर

वर्षभरातील उल्लेखनीय वाङमयनिर्मितीसाठी आशिर्वाद पुरस्कार हे वेगवेगळ्या साहित्यप्रकारात प्रत्येकी तीन पुरस्कार अशा प्रकारे देण्यात येतात. यावर्षी विशेष कादंबरीप्रकारातील प्रथम पुरस्कार रवींद्र बागडेलिखित 'गटुळं' या कादंबरीस मिळाला आहे. ही कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेली आहे. पुरस्कारप्रदान समारंभ पाच मे २००२ रोजी मुंबई मराठी संग्रहालय, नायगाव येथे संपन्न झाला. पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणून श्री. बाळकृष्ण खानविलकर,



श्री. श्रीकांत वेचलेकर, सौ. शामल वेचलेकर, डॉ. सुनील सावंत व सौ. सुचिता सावंत यांनी काम पाहिले.

## विठ्ठल पाटील यांना उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार

राज्य सरकारच्या वतीने उत्कृष्ट ग्रंथालय सेवकासाठी दिला जाणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार कराड येथील नगरपालिका वाचनालयाचे माजी ग्रंथपाल विठ्ठल पाटील यांना जाहीर झाला आहे.

या खऱ्याखुऱ्या ग्रंथप्रेमी व्यक्तीचा सत्कार झाल्याने कराडकरांना मनापासून आनंद झाला. श्री.पाटील हे कराड नगरवाचनालयात कित्येक वर्ष ग्रंथपाल म्हणून काम करत होते. निवृत्तीनंतरही त्यांनी याच क्षेत्रात काम करणे पसंत केले. वेणूताई चव्हाण स्मृती स्मारकामध्ये यशवंतराव चव्हाणांचे साहित्य संग्रहालयाच्या स्वरूपात ठेवण्यात आले आहे. त्याची संपूर्ण व्यवस्था विठ्ठल पाटील यांच्याकडे आहे. कराडमधील साहित्य, कलाक्षेत्रात श्री.पाटील यांचा कायम सहभाग असतो. शारदीय व्याख्यानमाला, ग्रंथ प्रदर्शन, दिंडी, साहित्य संमेलने या सर्वात ते पुढाकार घेत आले आहेत. कराडमधील पुस्तकप्रेमी वाचकांना ते साहजिकच मित्र वाटतात.

## अरविंद ताटके यांना आयडियल सर्वोत्कृष्ट वाचक पुरस्कार

आयडियल बुक कंपनीतर्फे सर्वोत्कृष्ट वाचकासाठी असलेला पुरस्कार यंदा ठाण्यातील अरविंद ताटके यांना देण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे वितरण २७ एप्रिल रोजी झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध लेखक शं. ना. नवरे आणि प्रमुख पाहुणेपदी प्रा.के.ज.पुराहित हे होते. दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार अनुक्रमे साताऱ्याच्या सुचित्रा रानडे आणि वामन लोंढे यांना मिळाला आहे. याशिवाय, यंदाचा संत नामदेव पुरस्कार मुंबईतील प्रसिद्ध चित्रकार बाळ ठाकूर यांना देण्यात आला. परीक्षक म्हणून रवींद्र पिंगे यांनी काम पाहिले.

## जब्बार पटेल यांना मध्यप्रदेश सरकारचा आंबेडकर स्मृती पुरस्कार

प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल यांना मध्यप्रदेश सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार दिला.

मध्यप्रदेशातील महू या ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री दिग्विजय सिंग यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. एक लाख रुपये रोख व ताम्रपत्र असा हा पुरस्कार आहे. मध्य प्रदेशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज विज्ञान संस्थेतर्फे सामाजिक न्यायाकरिता हा पुरस्कार ठेवण्यात आला आहे. त्यात सन १९९९-२०००च्या पुरस्कारासाठी डॉ.जब्बार पटेल यांची निवड करण्यात आली.

महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावर महाराष्ट्र सरकारतर्फे बनविण्यात येणाऱ्या चित्रपटाची जबाबदारी डॉ.पटेल यांच्याकडे देण्यात आली आहे. त्या चित्रपटासाठी अर्थसहाय्य करण्याचे आश्वासन दिग्विजय सिंग यांनी दिले. याशिवाय मध्यप्रदेशातील शाळांमधूनही डॉ.आंबेडकर यांच्या जीवनावरील चित्रपट दाखविण्यात येईल, असे त्यांनी डॉ.पटेल यांच्याशी बोलताना सांगितले.

## कथा-काव्य-निबंध स्पर्धांचे विजेते

औरंगाबाद येथील संवाद कला व साहित्य प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धा, पु.ल. देशपांडे स्मृती विनोदी कथा व निबंधस्पर्धा या स्पर्धांचे निकाल जीवन विकास ग्रंथालयात जाहीर झाले. काव्यस्पर्धेत मुकुल बोरसे प्रथम, प्रभा सोनावणे द्वितीय आणि संदीप काळे यांचा तृतीय क्रमांक आहे.

विनोदी काव्य स्पर्धेचे प्रथम पारितोषिक पंढरीनाथ घाटे यांना, तर 'मला पुलंचे साहित्य का आवडते'या विषयावरील निबंध स्पर्धेचे पहिले पारितोषिक प्रणिता लाखे आणि तृतीय पारितोषिक दत्ता पाटील यांना मिळाले आहे. परीक्षक म्हणून प्रभा पार्डीकर, श्रीकांत सराफ आणि लक्ष्मीकांत डंख यांनी काम पाहिले.

## सुधीर फडके यांना चित्रगौरव पुरस्कार

भारतीय चित्रपटसृष्टीचे एक शिल्पकार, नरहर दामोदर ऊर्फ नानासाहेब सरपोतदार यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या चित्रगौरव पुरस्कारासाठी यंदा संगीत दिग्दर्शक सुधीर फडके यांची निवड करण्यात आली आहे. चित्रप्रतिभा पुरस्कार अमोल पालेकर यांना व नाट्यगौरव पुरस्कार गिरीश जोशी दिग्दर्शक एक झुंज वाऱ्याशी या नाटकाला देण्यात आला.

२१ एप्रिल रोजी म्हणजे नानासाहेबांच्या ६२व्या स्मृतिदिनानिमित्त पुण्यात झालेल्या कार्यक्रमाला पेट्रोलियम मंत्री राम नाईक व शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे प्रमुख पाहुणे होते.

## महाराष्ट्र टाइम्सला सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार

सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकासाठी देण्यात येणारा 'मनोरंजनकार का.र. मित्र' पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'च्या दिवाळी अंकाला जाहीर झाला आहे. मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबईच्या वतीने आयोजित स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून २२८ दिवाळी अंक आले होते. त्यातून सर्वोत्कृष्ट पुरस्कारासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'ची निवड करण्यात आली.

प्रतापराव माने पुरस्कृत उत्कृष्ट अंकासाठी 'सत्याग्रही विचारधारा', पांडुरंग नाटकर स्मृती उत्कृष्ट आध्यात्मिक पुरस्कारासाठी 'मन:शक्ती'तर साने गुरुजी उत्कृष्ट बालवाङ्मयासाठी 'टॉनिक' अंकाची निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उत्कृष्ट अंक म्हणून सुगंध, ऋतुरंग, वसंतश्री, चंद्रकांत, तारका, युगबोध यांची तर उल्लेखनीय अंक म्हणून ग्रहांकित कलाकुंज, दामिनी, समुद्र, हरि ओम दर्शन यांची निवड करण्यात आली.

मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी देण्यात येणारा 'प्रभाकर पाध्ये स्मृती' पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'चे वरिष्ठ सहसंपादक प्रकाश अकोलकर यांना देण्यात आला. 'डॉ. ना.भि.परुळेकर स्मृती' पुरस्कार कुमार कदम, 'पु. रा. बेहरे स्मृती' पुरस्कार एस. शंकरराव, 'श्रीकांत पालेकर स्मृती' पुरस्कार सुहास जोशी, यशवंत कृ. खाडिलकर स्मृती पुरस्कार विद्याधर चिंदरकर, मालतीबाई तेंडुलकर स्मृती पुरस्कार उज्वला पाटील-धर यांना देण्यात आले.

वृत्तपत्र लेखक व अन्य पुरस्कारही यावेळी जाहीर करण्यात आले. 'सदानंद लाड पुरस्कृत पु.ल.देशपांडे पुरस्कार' वि.आ. बुवा यांना तर स्तंभलेखनासाठीचा 'अनंत अस्लेकर पुरस्कार' श्रीमती शारदा साठे, एकनाथ फोंडके, तर 'युद्धशास्त्र लेखनाचा स्वातंत्र्यवीरांगना कस्तुरबाई दोशी स्मृती पुरस्कार' मेजर जनरल शशिकांत पित्रे यांना लाभला.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या प्रा.सुरेंद्र गावस्कर सभागृहात ४५वे वृत्तपत्र लेखक संमेलन व पुरस्कार वितरण झाले.

## बालसाहित्यास विविध पुरस्कार

कोल्हापूर येथील बालकुमार साहित्य सभेतर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बालसाहित्य मागविण्यात येत आहे. उत्कृष्ट साहित्यास प्रत्येकी एक हजार रुपयांचा शेवडे गुरुजी पुरस्कार व मातोश्री उमाबाई निगवेकर पुरस्कार आणि मोहन जोशी पुरस्कृत पाचशे रुपयांचा पुरस्कार देण्यात येईल. याशिवाय प्रत्येकी २५० रुपयांचे स्नेह पुरस्कार दिले जातील

## 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कारांचे वितरण

मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनतर्फे काल 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कारांचे वितरण ज्येष्ठ साहित्यिक डॉ.आनंद यादव यांच्या हस्ते ९ एप्रिल रोजी झाले. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, 'येरवडा विद्यापीठातील दिवस'या आत्मचरित्राचे लेखक डॉ. कुमार सप्तर्षी आणि 'गहाण पडलेली टेकडी' कथासंग्रहाच्या अनुवादक अंजली नरवणे यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले. शाहू स्मारक भवनात हा कार्यक्रम झाला.

ज्यांना जुना भारत हवा आहे, तेच भारत सतत पेटता ठेवत आहेत. गुजरातमधील दंगली हे त्याचेच उदरहरण आहे, असे प्रतिपादन डॉ. कुमार सप्तर्षी यांनी कोल्हापूर येथे केले.

गुजरातमधील जातीय दंगलीचा संदर्भ घेत श्री. सप्तर्षी म्हणाले, ''दलित, ख्रिश्चन, मुस्लिम ह समूह येथील बहुसंख्याक समाजाच्या हल्ल्याचे लक्ष्य झाले आहेत. गुजरातमध्ये केवळ मुस्लिम समाजावर हल्ले झाले नाहीत. जो मुस्लिम माणूस हिंदूंमध्ये मिळून मिसळून वागत होता त्यालाही लक्ष्य करण्यात आले. बंधुभावाची मानसिकता तोडायची म्हणजे पर्यायाने देश तोडायचा असाच



डावीकडून अंजनी नरवणे, डॉ. आनंद यादव,पुरस्कार स्वीकारताना श्री. कुमार सप्तर्षी, अनिल मेहता, प्रा. मंदा कदम

हा प्रयत्न आहे. गुजरातेत माणसे जाळली नाहीत. तर विशिष्ट प्रकारच्या रसायनांचा वापर झाला. त्या रसायनामुळे विद्युतदाहिनी इतके तापमान निर्माण होते. त्यामुळे माणसे बेपत्ता झाल्याचे चित्र निर्माण झाले. प्रत्यक्षात जाळलेल्या माणसांची फक्त हाडेच शिल्लक राहिली. ज्यांना ज्यांना जुना भारत हवा आहे त्यांना भारत सतत पेटता ठेवायचा आहे. धर्माने हे शिकवलेले नाही कारण हिंसा म्हणजेच अधर्म मानला जातो. परंतु धर्माची सरहद्द ती राष्ट्राची सरहद्द इसे मानणारेच देश रक्तबंबाळ करत आहेत. त्यांचे डोके ज्यूंचे, जेरूसेलमचे आहे.''

''आपल्या समाजाच्या संकल्प परिवर्तनाचा, बंधुतेचा, समानतेचा आहे. मानसिकता मात्र बदल न स्वीकारणारी प्रतिक्रांतीची आहे. त्यामुळे अशा स्थितीत समाजात बदल कसा होणार? राजकीय पक्ष संस्था म्हणून पूर्ण अपयशी झाले आहेत. नेत्यांचे वाढदिवस साजरे करण्यापलीकडे त्यांच्याकडे दुसरा कार्यक्रम नाही. 'देश दुरुस्त करणे आता शक्य नाही' अशी हतबलता त्यांच्यात निर्माण झाल्याने प्रतिक्रांतिवाल्यांना मोकळे रान मिळाले आहे.''

आनंद यादव यांनी पुरस्कार देण्यामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले,''साहित्य संस्था परिवर्तनाचे माध्यम असतात पंरतु आज अनेक संस्था जुन्या साहित्यिकांचे श्राद्ध घालण्यापुरत्या उरल्या आहेत. वैचारिक, सांस्कृतिक नेतृत्व त्यांच्याकडे उरलेले नाही. अशा पार्श्वभूमीवर दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेकडून समाजाला मोठ्या आशा आहेत. सभेच्या नंदादीपाप्रमाणे सुरू असलेल्या कार्याला गती मिळावी म्हणून हा पुरस्कार दिला आहे.''

सामाजिक क्रांतीची नवी मांडणी करणारा आदर्श तरुण पिढीसमोर ठेवण्याच्या हेतूने डॉ.सप्तर्षींची निवड केली. 'गहाण पडलेली टेकडी'हे स्त्रीच्या गुलामगिरीचे प्रतीक आहे. स्त्रियांचे प्रश्न समाजापर्यंत जावेत या हेतूने या पुस्तकाची निवड केल्याचे त्यांनी सांगितले.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने कार्याध्यक्षा प्रा.मंदा कदम यांनी पुरस्कार स्वीकारला. त्या म्हणाल्या, ''दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेने ग्रामीण भागातील लोकांना व्यासपीठ मिळवून दिले. दडपलेल्या आवाजांना संधी दिली.''

श्रीमती अंजनी नरवणे म्हणाल्या,''देशात अनेक भाषा आणि त्यामध्ये समृद्ध वाङ्मय आहे. परंतु आपण कुंपणे घालून घेतल्यामुळे या साहित्याला मुकत आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊसकडून हे कुंपणे काढण्याचे काम अगत्याने केले जाते. भाषा समजली की माणूस समजतो म्हणून अनुवादाचे महत्व आहे''

## हा तर आनंददायी भाग्ययोग : शांता शेळके

''ज्यांचा स्नेह, आपुलकी कायम लाभली त्या पु.लं.च्या नावाचा पुरस्कार ज्यांच्या गाण्याने आनंदाचा ठेवा दिला त्या पंडित भीमसेनजींच्या हस्ते मिळावा, हा मला आयुष्यातील आनंददायी भाग्ययोग वाटतो'', असे मनोगत ज्येष्ठ लेखिका शांता शेळके यांना व्यक्त केले.

श्रीराम पुजारी ट्रस्टतर्फे देण्यात येणारा 'पु.ल.देशपांडे बहुरुपी सन्मान' पं. भीमसेन जोशी यांच्या हस्ते शांता शेळके यांना देण्यात आला, तर पं. कुमार गंधर्व स्मृती पुरस्कार युवा गायिका मंजिरी कर्वे-आलेगावकर यांना देण्यात आला. प्रत्येकी पाच हजार रुपये व सन्मानचिन्ह असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.



पुलंच्या काही आठवणींही शांताबाईंनी सांगितल्या. पुलंची आणि माझी पिढी एकाच तऱ्हेचे साहित्य, संगीताचे संस्कार घेणारी होती. त्यांच्या वागण्यातला घरगुतीपणा, अनौपचारिकता यांचा मी अनेकदा अनुभव घेतला आहे.

पुण्यभूषण पुरस्कारविजेते जब्बार पटेल यांचाही सत्कार करण्यात आला. कलेकडे निकोप दृष्टीने कसे पहावे, हे मी सोलापुरात श्रीराम पुजारी यांच्या घरी व त्यांच्या परिचितांच्या सहवासातून शिकलो. त्यांच्या घरी साहित्य, संगीत, सामाजिक कार्य यातील दिग्गजांचा सहवास लाभला. ते वातावरण खूप प्रेरणादायक ठरले, असे उद्गार डॉ.जब्बार पटेल यांनी काढले.

## उत्कृष्ट ग्रंथालय व सेवक राज्यस्तरीय पुरस्कार

महाराष्ट्र सरकारचे सन २०००-२००१चे उत्कृष्ट ग्रंथालयाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक यांच्यासाठीचे डॉ.एस.आर रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई येथे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. (ग्रंथालयाचे नाव, वर्ग, पुरस्काराची रक्कम रुपये या क्रमाने)

शहर विभाग : १. श्री.हिराचंद नेमचंद वाचनालय, १३४, मुरारजी पेठ, सोलापूर जिल्हा 'अ' २५,०००रु.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय, जवाहर कॉलनी, औरंगाबाद इतर 'ब' १५,०००रु.

३. सार्वजनिक वाचनालय भास्कर सभागृह, भरत नगर, नागपूर, इतर 'क' १०,०००रु

ग्रामीण विभाग : १. ग्रंथालय पात्र नाही. 'अ' २५,०००रु

२. सावतानगर वाचनालय, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती, इतर 'ब' १५,०००रु

३. प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालय, लोणी, ता.राहता, जि, नगर. तालुका 'क' १०,०००रु,

४. श्री.ज्ञानेश्वर ग्रंथालय, ज्ञानेश्वरनगर, भेंडे, ता.नेवासा, जि.नगर. 'ड' ५,०००रु,

डॉ.एस.आर.रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार : उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता : १. दत्तात्रय धर्मराज गवांदे (मालेगाव, जि. नाशिक) रु.५ हजार,

२. डॉ.विनायक महादेव शिंदे, (रत्नागिरी) रु.५हजार

उत्कृष्ट ग्रंथालय सेवक : १. विठ्ठल विष्णू पाटील, (कराड, जि.सातारा) रु.५ हजार

## ह. मो. मराठे यांच्या बालकाण्डला कोठावळे पुरस्कार

'केशवराव कोठावळे पारितोषिक'समितीने यंदाच्या पारितोषिकासाठी ह.मा.मराठे लिखित 'बालकाण्ड' या आत्मकहाणीची एकमताने निवड केली आहे. हे पारितोषिक पंधरा हजरा एकशेएकावन्न रुपयांचे आहे. आपल्या बालवयतील अभावग्रस्त आयुष्याचे, वडिलांच्या विक्षिप्त, उग्र स्वभावामुळे, हुकुमशाही वृत्तीमुळे अधिकच खडतर झालेल्या जगण्याचे, स्वत:च्या व कुटुंबीयांच्या पराकोटीच्या शोषणाचे, कलात्मक तटस्थतेने साधलेले अतिशय संयत व मर्मग्राही चित्रण 'बालकाण्ड'मध्ये आढळते.

## खास सुट्टीनिमित्त...

**मुदत १५ जून २००२**

# सुट्टी लागली.... आता... खूप खूप गोष्टीची पुस्तकं वाचा.. चित्रं काढा..रंगवा.. धमाल करा.. सुट्टीची मजा लुटा.....

## छान छान पुस्तकांवर ॲक्रॉनच्या वस्तू मोफत!

**मोफत!**
२० रुपयांचा
बोल्ड क्रेयॉन बॉक्स





* मोठ्यांच्या छोट्या गोष्टी व जातक कथांचा संच - १३०रुपयांत !
* हा खेळ बाहुल्यांचा व हितोपदेश कथांचा संच - १३०रुपयांत !
* वैज्ञानिक खेळणी व पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टींचा संच - १३०रुपयांत !
* सूर्यास्त व बिरबलच्या मजेदार गोष्टींचा संच - १३०रुपयांत !

**या सर्व संचांवर २० रुपयांचा बोल्ड क्रेयॉन बॉक्स मोफत!**

**योजना फक्त पुणे व कोल्हापूर येथेच उपलब्ध!**



## छान छान पुस्तकांवर ॲक्रॉनच्या वस्तू मोफत!




**मोफत!**
स्पार्कल रंग किंवा
३०रुपयांचा ॲक्रॉन
रंगीला पॅक

* आत्मविश्वासाचा कानमंत्र, उत्तम स्मृतीचा कानमंत्र व यशाचा कानमंत्र १४०रुपयांत !
* ही सुट्टी कशी घालवाल, इझी इंग्लिश ग्रामर व अस्थी - १५२ रुपयांत !
* मुलांच्या समृद्ध जीवनासाठी व तुम्ही आणि तुमची मुलं - १६० रुपयांत !
* जिज्ञासापूर्ती - १५० रुपयांत !

**या सर्व संचांवर ३० रुपयांचा ॲक्रॉन रंगीला व स्पार्कल पॅक मोफत!**

**मोफत!**
२४ शेड्सचा
४० रुपयांचा
ऑईलपेस्टल पॅक




* चला प्रयोग करू या (१२ पुस्तकांचा संच) - २४०रुपयांत !
* मुलांवरचे संस्कार, आजचा मेनू व घरटे - २२०रुपयांत !
* रुचिरा भाग १, यज्ञकुंड व बुद्धीबळ शिका - २३०रुपयांत !
* नॉट विदाऊट माय डॉटर व पृथ्वीवर माणूस उपराच! - २७०रुपयांत !

**या सर्व संचांवर ४० रुपयांचा ऑईलपेस्टल पॅक मोफत!**

# संच येथे मिळतील...

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, मुलांच्या भावे हायस्कूलजवळ, पुणे-३०
फोन नं. ४४७६९२४,४४७५४६२

**मेहता बुक सेलर्स,** ३२२,भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर-१२
फोन नं. ५२२३०४

**परेश एजन्सी,** ५, शनिवार पेठ,प्रभात टॉकिजसमोर,पुणे ३०
फोन नं. ४४५९१९०

**उज्ज्वल ग्रंथ भांडार,** अप्पा बळवंत चौक,पुणे ३०.
फोन नं.४४५६९०८

**शुभम् साहित्य,** ६६६,नारायण पेठ, आप्पा बळवंत चौक, पुणे-३०
फोन नं. ४४७४३२२

**ललित वितरण,** १७१२/१ ब,उद्यान कार्यालय बिल्डिंग, सदाशिव पेठ, पुणे-३० फोन नं. ४४७७३०२

**वसुधा मेडिको,** बाणेर रोड, सकाळनगर, पुणे.
फोन नं. ५६७६१९९


**उत्कर्ष बुक सर्व्हिस,** ७०१,शिवाजीनगर, डेक्कन जिमखाना,पुणे -४
फोन नं. ५५३२४७९

## मुलांना आणि पालकांनाही उपयुक्त ठरणारी आमची इतर काही लोकप्रिय पुस्तके

| | | |
|---|---|---|
| जिज्ञासेतून विज्ञान | कविता भालेराव | ३५रु. |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ५०रु. |
| संस्कार कथा | शं. व्यं. काश्यपे | ६०रु. |
| अभ्यासातील प्राविण्य | अनु. वसंत नागपुरे | ३५रु. |
| छंदातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | ६०रु. |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस्. इटोकर | ६०रु. |
| ज्ञानदा निबंधमाला | दिपाली पोरे-वेल्हाळ | ५०रु. |
| करोडोंचे सामान्यज्ञान | सुनीता दांडेकर | ८०रु. |
| नामशेष झालेले प्राणी | डॉ. किशोर पवार | ५०रु. |

**या प्रमाणेच अजूनही अनेक दर्जेदार पुस्तके...**
**सर्व पुस्तक विक्रेत्यांकडेही उपलब्ध.**






पुस्तक परिचय

# गोष्टी चातुर्याच्या

**बिरबलाच्या चातुर्याच्या आणि हजरजबाबीपणाच्या गोष्टी आजही अर्थपूर्ण**

आपल्या अवतीभवतीचे जग कसे आहे? आपली कसोटी बघणारे.

आपल्या अवतीभवतीची माणसे कशी आहेत? प्रामाणिक? लबाड? खोटारडी? फसवणारी? स्वार्थी?

आपल्या आयुष्यात लहान मोठे पेचप्रसंग सारखे येत असतात. त्यातून सुटण्यासठी कशाचा वापर करावा लागतो? बळाचा? धाकदपटशाचा? युक्तीचा? बुद्धीचा? चातुर्याचा? हजरजबाबीपणाचा? प्रसंगावधानाचा?

सत्य हे शेवटी विजयी होते अशी आपली श्रद्धा असते. परंतु सत्य काय हे सदैव लोकांना स्पष्ट होतेच असे नाही. ते सत्य शोधून काढणे हाही सोपी गोष्ट नसते. त्यासाठीही आपल्या बुद्धीचा वा व्यवहारज्ञानाचा उपयोग करावा लागतो. प्रत्येकवेळी त्यासाठी जागरुक राहावे लागते.

या जगात पावलोपावली आपल्यावर संकटे येत असतात; कधी कधी ती आपल्या जीवालाच धोका उत्पन्न करतात. आपण त्या संकटाशी सरळ सामना करू शकत नाही. कारण समोरची माणसे वा संघटना या आपल्यापेक्षा अधिक सामर्थ्यशाली असतात. एखाद्या पहिलवानाशी शारीरिक बळाने सामना करता येत नाही. मग्रुर शासनसत्तेशी एकाकी झुंज देता येत नाही. अशा वेळी आपण जगायचे कसे हा प्रश्न असतो. आपण आपल्या बुद्धीचा, चातुर्याचा उपयोग करून अशा मोठ्या सत्ताधीशांपासून आपला जीव वाचवावा लागतो. या जगात बावळट, बिनडोक, निष्क्रिय राहून चालत नाही. निभाव लागत नाही. प्रत्येकाला पुढे जायचे असते, सत्ता, संपत्ती, कीर्ती, हवी असते, पण त्यासाठी कष्ट करायची तयारी नसते. त्यामुळे अनेक माणसे चांगल्या माणसांची अवहेलना करतात. त्यांची प्रतिमा मलिन करू पाहतात. पण अशा लोकांना आवर घालणे ही गरजेचे भासते.

या जगात आपला निभाव लागावा, आपल्याला त्रास देऊ पाहणाऱ्यांचा बंदोबस्त करता यावा, आपल्या अवतीभवतीच्या माणसांशी चांगले संबंध ठेवून मानाने जगता यावे, अन्याय व असत्य यांच्याशी संघर्ष करता यावा, आपली प्रगती साधता यावी, आपल्या मार्गात अडथळे आणणाऱ्यांच्या समाचार घेता यावा यासाठी ज्ञानाचा वापर करावा लागतो. चातुर्य दाखवावे लागते.

हे बालपणीच आपल्या मनावर नकळत ठसवण्याचे काम कोण करते? हितोपदेश-पंचतंत्रातील कथा, इसापच्या कथा, बिरबल बादशहाच्या कथा, तेनालीरामच्या कथा, झेन कथा,

अरेबियन नाइटस्, शेखचिल्लीच्या कथा, यासारख्या चतुर चलाख कथा.

साहित्याद्वारे हे काम पिढ्यान्पिढ्या होत आले आहे. ह्या चतुराईच्या कथांना विश्वसाहित्यात स्थान मिळालेले आहे, त्यांच्या पुस्तकांच्या लाखो प्रती आजवर खपलेल्या आहेत. या खजिन्यात जे काही आपल्याला बरे वाटले, ते घेऊन त्यावर जगभरातील शेकडो साहित्यकारांनी आपल्या शब्दकल्पनांचा आपापल्या परीने साज चढवला आहे. चित्रकारांनी त्यातील विविध घटना-प्रसंगांवर आपल्या रंगरेषांची उधळण केली आहे. बालसाहित्य म्हणून त्यांचा निर्देश होत असला तरी हे खरे विश्वसाहित्य आहे; आणि जगातल्या प्रत्येक मुलाला ते एका समाईक वारशात सामील करून घेऊन त्याला विश्वनागरिकत्वाची दीक्षा देत असते. एखादा विशिष्ट समाज वा देश त्यांच्या सीमा पुसून टाकून हे साहित्य प्रत्येक म्हणून शक्तिबुद्धीच्या बळावर, चातुर्य व व्यवहारज्ञानाच्या बळावर मुलाला माणूस कसे जगता येते याचेच पाठ देत असते; पण तेही रंजनाच्या माध्यमातून. त्यामुळे त्यांची लोकप्रियता ही पिढ्यान्पिढ्या टिकून राहिलेली आहे.

बिरबलाच्याच कथा घ्या.

बिरबल हा अकबर बादशहाच्या नवरत्नांपैकी एक. उत्तम प्रशासक. बुद्धिमान, हजरजबाबी. त्याचे मूळ नाव महेशदास. व्यवहारज्ञानाने, चातुर्याने, हजरजबाबीपणाने सत्याचा व चांगुलपणाचाच शेवटी जय होतो हे या कथांद्वारे मनावर ठसवले जाते. ठकासी असावे ठक, शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ वगैरे सूत्रे बिरबलाच्या कथांमधून वरचेवर लक्षात येतात.

अकबर बादशहाला गोष्टी ऐकण्याचा छंद होता. रोज रात्री गोष्ट ऐकल्याशिवाय त्याला झोपच येत नसे. रोज एकेका सरदाराची गोष्ट सांगण्याची पाळी असे. बिरबलाचीही गोष्ट सांगण्याची पाळी येते तेव्हा बादशहा म्हणतो, आज एखादी नवीन आणि लांबलचक गोष्ट सांग.

आता नवीन व लांबलचक गोष्ट सांगणे ही काही सोपी गोष्ट नाही. तेव्हा बिरबल आपले डोके वापरतो. तो एका प्रचंड गोदामात एक फट राहिल्याने एक चिमणी त्यात येते आणि एकेक गव्हाचा दाणा घेऊन बाहेर जाते-अशी कल्पना केंद्रस्थानी ठेवून एका न संपणाऱ्या गोष्टीचा बिरबल घाट घालतो.

''त्या भिंतीच्या फटीतून एक चिमणी आली. गव्हाचा एक दाणा चोचीत घेऊन ती उडून गेली... मग आणखी एक चिमणी फटीतून आत आली. एक दाणा चोचीत घेऊन उडून गेली.''...

बादशहा त्याला म्हणतो, ''खूप चिमण्या आल्या. दाणा घेऊन उडून गेल्या. पुढे काय झाले ते सांग.''

बिरबल म्हणतो,''तिथं लाखो चिमण्या होत्या. त्यातल्या पन्नास चिमण्यांबद्दल काय ते मी आतापर्यंत सांगितलंय. आता त्या उरलेल्या चिमण्यांचं होईपर्यंत पुढं काय होणार हे मी तरी कसं सांगू शकणार? त्यासाठी कदाचित बरेच दिवस लागतील. कदाचित बरेच महिने, कदाचित बरीच वर्षेही लागू शकतील.''

अर्थातच यावर बादशहाची प्रतिक्रिया काय असणार? तो म्हणाला,''बस बस बिरबल. बंद कर तुझी ही गोष्ट. मला झोप येतेय.''

पुढे काय होणार याची उत्सुकता क्षणोक्षणी चाळवत राहते हे उत्कृष्ट व प्रभावी कथाकथनतंत्राचे मुख्य सूत्र असते. ज्या क्षणी ही उत्कंठा संपते त्या क्षणी श्रोत्याचा वा



वाचकाचा रस संपतो. या सूत्राचे दर्शन तर या कथेत घडतेच. परंतु बादशहासारख्या व्यक्ती लांबलचक गोष्ट हवी अशी काहीशी अवास्तव अपेक्षा बाळगतात, त्यांना त्यांच्या अपेक्षा रिकामटेकड्या मूढतेच्या आहेत याचीही जाणीव करून देणे आवश्यक असते. तुमची अपेक्षा मूर्खपणाची आहे असे सरळ तर सांगता येत नाही. तेव्हा बिरबल हेच काम आपल्या चातुर्याने पार पाडतो. बादशहाला न दुखावता अप्रिय सत्याची जाणीव चलाखीने करून देतो.

अकबराच्या दरबारात लंकेहून आलेला दूत विचित्र मागणी करतो. ''जहाँपनाह, आपल्या दरबारात एकाहून एक बुद्धिमान रत्नं आहेत, म्हणून आमच्या महाराजांनी एक घागरभर अक्कल घेऊन यायला मला सांगितलं आहे.''

आता अक्कल ही गोष्ट काही घागरीत भरता येईल अशी नसते. सध्या बुद्धिमत्ताचाचणी घेऊन बुद्धीचे मोजमाप करता येते. पण घागरभर अक्कल अशी कोणी मागणी करणे ही मूर्खपणाचीच गोष्ट ठरते. या मूर्खपणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी बिरबल युक्ती करतो? तो भोपळ्याच्या वेलीवर भोपळे बारीक असताना घागर पालथी घालायला सांगतो. भोपळा घागरीत मोठा होतो. घागरीत मोठा वाढलेला भोपळा बाहेर काढणे अशक्यच ठरते. तेव्हा 'ही घ्या घागरभर अक्कल'असे म्हणून लंकेच्या राजदूताकडे ती घागर सोपवण्यात येते; आणि सांगण्यात येते, ''या घागरीत जे अकलेचे फळ आहे ते घागरीला अजिबात हानी न पोहचवता जसेच्या तसे अख्खे बाहेर काढले तरच परिणामकारक ठरेल. फळ फुटले तर ती अक्कल त्यातून बाहेर निसटेल.''


चमत्कारिक मागणी पूर्ण करण्यासाठी अशीच काही चतुराई वापरावी लागते.

बादशहा एकदा दहा मूर्ख माणसे घेऊन येण्याची बिरबलाला आज्ञा करतो. बिरबल आठ मूर्ख माणसे गोळा करून दरबारात येतो. बादशहा म्हणतो,''मी तुला दहा जणांना आणायला सांगितले होते. तू आठच जणांना आणलेस.'' बिरबल म्हणतो, ''बाकीचे दोन दरबारातच आहेत. तुम्ही आणि मी. एकूण दहा झाले.'' असल्या विचित्र कामासाठी पाठवणारे आपण एक मूर्ख आणि असल्या विचित्र आदेशाचे पालन करणारा मी दुसरा मूर्ख...'' आता बादशहा यावर निरुत्तर न झाला तरच नवल.

मानसशास्त्राचे अभिजात ज्ञान बिरबलाच्या अनेक गोष्टीत दिसून येते. चोर पकडायचा कसा असा प्रश्न त्याला पडतो, तेव्हा तो सर्व संशयितांना एकेक काठी देतो, आणि ज्याने चोरी केली असेल त्याची काठी एका रात्रीत एक इंच वाढेल अशी माहिती देतो. खरा चोर यावर काय करणार? त्याची मानसिकता कशी काम करणार? हा खरा चोर आपली काठी एक इंच कापतो. आणि पकडला जातो. काठी अशी वाढत नाही हे त्याच्या लक्षात येत नाही. त्यामुळे बिरबलाच्या सापळ्यात तो नेमका अडकतो.

अशा या बिरबलाच्या गोष्टी म्हणजे व्यवहारज्ञान, चातुर्य व हजरजबाबीपणा यांचा खजिनाच आहे. लाजवाब बिरबल, विनोदवीर बिरबल, बिरबलाचे चातुर्य, बिरबलाच्या रोचक गोष्टी अशा चार पुस्तकांमध्ये डॉ.निर्मला सारडा यांनी यापैकी निवडक गोष्टींचे पुनर्निवेदन केले आहे.

मोठ्या आकारातील ही पुस्तके बहुरंगी चित्रांमुळे अधिकच देखणी झाली आहेत. संपूर्ण आर्टपेपरवर ती छापलेली आहेत. त्यामुळे सात-आठ या वयोगटातील मुलांना ती खूपच आवडतील.




# द लॉस्ट वर्ल्ड

**मूळ लेखक : मायकल क्रायटन**
**अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर**

**कधीकाळी डायनोसॉरांची वसाहत असलेल्या द्वीकल्पाचा शोध**

ज्युरॅसिक पार्क या चित्रपटाने व कादंबरीने जगभर धमाल उडवली. डायनासॉर या अस्तंगत झालेल्या प्राण्याचे जग सर्वांना प्रत्यक्ष उभे करून दाखविले.

'दि लॉस्ट वर्ल्ड : नष्ट झालेले जग' ही मायकेल क्रायटनची कादंबरी. ज्युरॅसिक पार्कमध्ये साडेसहा कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवर अस्तित्वात असणाऱ्या डायनासॉरचे डीएनए रेणू राळेतील कीटकांच्या जीवाश्मातून मिळवून आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाच्या सहाय्याने, एका बेटावर डायनोसॉरचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून एक ॲम्युझमेंट पार्क निर्माण करण्याची महत्वाकांक्षी योजना जॉन हॅमान्ड हा अब्जाधीश उद्योगपती आखतो असे मध्यवर्ती सूत्र होते.

'दि लॉस्ट वर्ल्ड'मध्ये काही पुराजीवशास्त्रज्ञांना व संशोधकांना मृत्यूच्या बेटावर, कोट्यवधी वर्षापूर्वीच्या अजस्त्र प्राण्याचे अवशेष सापडतात. अप्रगत मेंदूच्या त्या प्राण्याच्या वर्तनाचे माणसाच्या काही वृत्तिप्रवृत्तीशीं साम्य आढळते आणि त्यांना आश्चर्य वाटते. त्याच वेळी गोबीच्या वाळवंटात, कोस्टारिकाच्या परिसरात काही अजस्त्र प्राण्यांचे सांगाडे व अवशेष सापडल्याच्या बातम्या येतात. त्यामुळे संशोधक अधिकच नेटाने नष्ट झालेल्या त्या जगाचा शोध लावण्यासाठी कंबर कसतात. 'दि लॉस्ट वर्ल्ड' मध्ये त्या संशोधकांच्या हाती काय लागले त्याचीच कहाणी आली आहे.

१९८० मध्ये लुई अल्वारेज आणि त्याचे सहकारी यांनी क्रिटेशियस आणि टर्शरी कालखंडातील के-टी सीमारेषाविषयक काही कल्पना मांडल्या. या सीमारेषेवर असणाऱ्या खडकांमध्ये इरिडियम हे मूलद्रव्य आढळते. हे मूलद्रव्य पृथ्वीवर वा भूभागात फार अल्प प्रमाणात आढळते. मात्र पृथ्वीवर आदळणाऱ्या उल्कांमध्ये ते भरपूर असते. त्यावरून अल्वारेजने असा सिद्धांत मांडला की क्रिटेशियन कालखंडाच्या अखेरीस पृथ्वीवर कित्येक मैल व्यासाची एखादी उल्का आदळली असावी अणि त्यामुळे पृथ्वीवर उडालेल्या प्रचंड धुळीने वनस्पती अन्न तयार करू शकल्या नाहीत. आणि परिणामी वनस्पती तसेच सर्व प्राणी मृत झाले असावेत. त्यातून डायनासॉर युगाचा अंत झाला असावा. हा सिद्धान्त संशोधकांचे कुतूहल चाळवणारा ठरला. अशा उल्काजन्य विवराचा शोध सुरू झाला.

१९९३ मध्ये सांता फे या संस्थेच्या बैठकीत इयान माल्कम या गणितज्ञाने ही कल्पना



**पुस्तकाची खास वैशिष्टचे...**

- 'ज्युरासिक पार्क'च्या पुढची कथा रंगवणारी कादंबरी
- 'ज्युरासिक पार्क'मध्ये राळेपासून डायनोसॉरची निर्मिती करण्यात आली; आता त्यांच्या प्रायॉनपासून निर्मिती करण्याची योजना
- वर्तनातील बदलातूनच सजीवांच्या प्रजाती नष्ट होतात असा सिद्धान्त मांडण्याचा प्रयत्न
- बौद्धिक विविधता नष्ट झाली तर माणसाची उत्क्रांत होण्याची क्षमताच नष्ट होईल?

होते- हे चाळीस लाख वर्षांचे जीवनचक्र आहे. सस्तन प्राण्यांबाबत हे चक्र दहा लाख वर्षांचे आढळते. समुद्र आटला किंवा त्याचे पाणी जास्त खारट झाले तर त्यातील सूक्ष्म वनस्पतीजीवन नष्ट होईल. पण डायनोसॉरसारखा महाकाय प्राणी अशा बदलांना तोंड देऊ शकेल अशा शरीररचना उत्क्रांत करीतच वाढलेला असतो. त्यामुळे तो मरून जाण्याचे सयुक्तिक कारण दिसत नाही. हे प्राणी आपल्या वर्तनामुळे नष्ट झाले असावेत, त्याबाबत केऑस सिद्धान्त लागू पडतो.'' प्रगत प्राण्यांचे वर्तन हे वेगानं बदलत असतं, पण ते नेहमी भल्यासाठीच असतं असं नाही. डायनोसॉरच्या विनाशानंतरच सस्तन प्राण्यांचा व मानवाचा उदय व्हायला वाव मिळाला. म्हणून आपलाही एक दिवस विनाश होणार का, आपल्या वर्तनातूनच हा विनाश घडून येणार का या प्रश्नाने माणसाला चिंता वाटते असे त्या भाषणातून इयान माल्कमने प्रतिपादन केले. त्या बैठकीला जगातले नामवंत शास्त्रज्ञही हजर होते, तज्ज्ञ हजर होते. त्यांनी त्याच्या प्रतिपादनावर वेगवेगळे विचार मांडले.

जीवाश्मांच्या अभ्यासातून एकच गोष्ट लक्षात येते; ती म्हणजे अमुक जातीचा प्राणी कधी काळी अस्तित्वात होता, आणि आता नाही.

विनाश ही संकल्पना धार्मिक व राजकीय वादाला कारण ठरू शकते.

रिचर्ड लेविन नावाचा तरुण शास्त्रज्ञ माल्कमला म्हणतो, ''डायनोसॉर हे क्रिटेशिअस कालखंडात सर्व पृथ्वीवर होते. त्यांचे जीवाश्म सर्वत्र आढळतात. आता पृथ्वीवरच्या सर्व डायनोसॉर्सचे वर्तन एकाच वेळी कसे बदलले? कुठेतरी त्यांचे जिवंत नमुने उरले असणारच. त्यांचा शोध घ्यायला हवा. कुठेतरी ते सापडणारच.''

डीएनए हा जीवाचा सर्वात सूक्ष्म घटक आपण मानतो. तसा तो नसून प्रायॉन हा मूलभूत जीवकण आहे हे लक्षात घेतले तर नव्याने संशोधन होऊ शकेल असे माल्कम सांगतो.

आणि अशा एका संशोधन मोहिमेची योजना लगेच आखली जाते. विनाश पावलेलं काल्पनिक जग शोधण्यासाठी दीडेक वर्षाने रिचर्ड लेविन, कोस्टा रिकाच्या दाट जंगलात

हेलिकॉप्टरने जातो. अमेरिकन जीवशास्त्रज्ञ मार्टी कगटारेझ (वय ३६) हा वर्षारण्यातील सजीवांच्या प्रजाती कशा बनतात याच्या अभ्यासासाठी कोस्टा रिकात आठ वर्षांपासून राहत असतो. तोही लेविन बरोबर येल विद्यापीठात एकाच वेळी पीएचडी करीत होता. पुढं लेविन नष्ट झालेल्या डायनोसॉरच्या शोधात जगभर फिरत राहिला.

लेविन आणि गिटारेझ जुआन फर्नांडिस खाडीजवळ हेलिकॉप्टर उतरवतात. तिथे त्यांना एका प्राण्याचा सांगाडा दिसतो. कुजक्या मांसाचा दर्प येत असूनही लेविन त्याचे निरीक्षण करतो. हा डायनोसॉरचा प्रकार नाही हे त्याच्या लक्षात येते. आजवर सर्वस्वी अज्ञात असा तो कोणी प्राणी आहे हे असे त्याला जाणवते. प्राण्याच्या मागच्या पायाचे स्नायू लांब होते, त्याअर्थी तो मागच्या पायांवर उभा राहणारा आणि दोन पायांवर चालणारा असे त्याला वाटले. पण त्याला त्या प्राण्याचे फोटो घेऊ दिले जात नाहीत. त्या प्राण्याचे दात मांसभक्षक प्राण्यासारखे दिसत होते. डोळ्यांच्या खोबणीही त्याला होत्या. त्या सांगाड्याला दुसऱ्या हेलिकॉप्टरमधून उतरलेली काही माणसे आग लावतात व तो सांगाडा जाळून टाकतात. असे विचित्र प्राणी त्या भागात गेली पाच वर्षे दिसत असतात आणि ते सोयाबीनच्या शेतांवर धाड घालतात म्हणून त्यांना जाळून तेथील सरकार शेतकऱ्यांना संरक्षण देत असते; अशी माहिती लेविनला कळते. परंतु त्याबाबत गुप्तता पाळली जात असते.

या भागात एक नवा एनसिफलायटीस रोगाचे अस्तित्वही जाणवते. डोकेदुखी, ताप, डोकं हलकं होणं आणि भ्रम होणं- ही त्याची लक्षणे. या रोगाचा व विचित्र प्राण्याचा काही संबंध असावा असाही कयास होता. तेथील सरकारने या प्राण्यांचा छडा लावण्यासाठी अनेक शोध मोहिमा राबविलेल्या असतात. तालामान्का, सोर्ना, मोराझ्रान वगैरे बेटांचीही पाहणी केलेली असते. हे प्राणी घनदाट जंगलातून बाहेर पडत असावेत, त्यामुळे त्यांचा ठावठिकाणा लावणे शक्य होत नव्हते. त्या जंगलात माणसांना शिरकाव करून घेणेही अशक्यप्राय असते.

जगातील सर्वोत्तम अशा निसर्ग संपत्तीचं वरदान लाभलेल्या कोस्टारिकामध्ये पाच लाखावर सजीवांच्या जाती आढळतात. जगातल्या पाच टक्के जाती तर कोस्टारिकाशिवाय अन्यत्र कुठेच सापडत नाहीत. त्यामुळे या भागात शास्त्रज्ञ-संशोधकांची सतत वर्दळ असते. अनेक व्यापारी औषधी कंपन्या यातील वनस्पती व प्राणी यांच्या औषधी उपयोगाच्या संशोधनात गढलेल्या असून, त्यापासून आर्थिक लाभ उठविण्यासाठी उत्सुक असतात. त्यांच्यातील या लुटारू वृत्तीचाही खऱ्या शास्त्रज्ञांना धोका वाटतो.

कोस्टारिकाच्या विमानतळावरून सान फ्रान्सिस्कोला विशिष्ट सांकेतिक नंबरावर फोन करून लेविन आपल्या मोहिमेची माहिती देतो. 'एकच नमुना होता. तुमच्या नकाशात बीबी-१७ ही जागा पहा. तो प्राणी कोणता हे ओळखता आले नाही. तो ऑर्निथोलेस्टस असावा... त्याच्या पायावर घाव घातल्याची जखम होती ही गोष्ट मला धक्कादायक वाटते. मी सँपल पाठवतोय. काहीतरी नवीन भानगड आहे.'

त्याचवेळी त्याला त्याच्या हेलिकॉप्टरचा पायलट इंग्लिशमधून फोनवर बोलताना दिसतो. तेव्हा आश्चर्य वाटते. कारण त्यानं आधी आपल्याला इंग्लिश येत नाही असे म्हटलेले होते.''ते एक बेट आहे. आणि बेसल्टन, त्याला काही कळलेलं नाही. फोटोही घेतलेले नाहीत. तो आज रात्री येथून निघतोय.'' असे त्याचे फोनवरचे बोलणे लेविनला ऐकू येते.



आणि ते फोनवरचे बोलणे ऐकल्यावर आधी ठरलेल्या परतीच्या त्या विमानात तो बसतच नाही.

इकडे माल्कमकडे एक पार्सल कुरिअरमार्फत येते. ते कोस्टा रिकातून लेविनने पाठवलेले असते. त्या खोक्यात एक स्टेनलेस स्टीलची नळी असते. तिच्यावर जैविक धोकादर्शक चिन्ह असते. बाजूला दुसरी छोटी नळी असते. त्या नळीतून हिरव्या मांसाचा एक छोटा तुकडा बाहेर येतो. आणि 'माझं बरोबर आहे. तू चुकत आहेस.' अशी चिठ्ठीही त्या नळीत असते. माल्कम त्याला शिवी हासडतो आणि प्राणिसंग्रहालयातल्या एलिझाबेथ गेलमनला फोन लावतो आणि सांगतो की, एक  गुप्त स्वरूपाचं कामं आहे.

विमानतळावरून लेविन जो गायब होतो, तो दोन सहकाऱ्यांसह बोटीने एका निर्जन बेटावर येतो. एका प्राचीन ज्वालामुखीचं मुख असणारं हे बेट, त्यातील घळींमधूनच विवराच्या मध्यभागी असणाऱ्या पृष्ठभागाकडे जाता येणार असतं.

मानवाचा शिरकाव न झालेल्या एका दाट जंगलात त्यांचा प्रवेश होतो. वीस फूट उंचीची नेच्याची झाडे त्याला दिसतात. माणसाएवढी मोठी पाने त्याला असतात. एका झऱ्याजवळ एका प्राण्याच्या विष्ठेवरून त्याचा पाय घसरतो. हिरव्या रंगाची ती विष्ठा असते. मोठ्या शाकाहारी प्राण्याची ती असणार... नंतर प्रचंड पावलांचे ठसे दिसतात. तीनच नखे असणाऱ्या. मूससॉरस हा डायनोसॉर वर्गातला सर्वात छोटा प्राणी- तो त्याला दिसतो. हिस्स आवाज करून तो गडप होतो. लेविन सावध होतो. तेवढ्यात त्याच्याबरोबर असणाऱ्या दिएगो या सहकाऱ्याची किंकाळी ऐकू येते आणि दिएगोला कोणीतरी ओढून नेल्याचे त्याच्या लक्षात येते. लेविन जीवाच्या आकांताने पळत सुटतो. तो सेल्यूलर फोनवरून थॉर्नला सांगतो, 'मी लेविन -मला मदतीची गरज आहे. मी बेटावर पोचलोय. मला त्यांनी घेरलंय. मदतनीस दिएगो मेलाय. जखमा झाल्यात. मदत करा... मला लांब जाता येणार नाही.'

थॉर्न त्याच्या मदतीला येतो... त्याच्याबरोबर माल्कम असतो. आणि वीस फूट लांबीचा अजस्त्र प्राणी... त्याचे मलमूत्र विसर्जन... त्या विष्ठेवर ताव मारणारे कोंबडीसारखे प्राणी... त्या विष्ठेत काही पोषक द्रव्ये, प्रथिने, हार्मोन असणार. लेविन त्या विष्ठेचा नमुना प्लॅस्टिक पिशवीत घेतो... डॉ.थॉर्न लेविनच्या जखमांवर जंतुनाशक लावतात.

सारा हार्डिंग हीही त्या बेटावर येऊन पोचते.

त्यांचे प्रतिस्पर्धी बिसलटन- डॉजसन हेही त्या बेटावर येऊन पोचतात. खरे तर सारा हार्डिंगलाही त्यांनीच बरोबर आणलेले असते आणि तिला एका खाईत ढकललेले असते. पण ती वाचलेली असते हे त्याना माहित नसते.

टायनोसॉरची अंडी त्याला सापडतात. आणि एक पिलूही. त्या पिलाला जरा जखम झालेली असते. म्हणून त्याला सारा प्लॅस्टर करते. ब्लँकेटमध्ये गुंडाळते. सेन्सरवरून जवळच दोन टायरॅनोसॉर जवळ आल्याचे दिसते. ते त्यांच्या दिशेने ते टायरॅनोसॉर येतहेत हेही जाणवते. ते काहीतरी शोधत आहेत, हे साराला कळते. ती ट्रेलरच्या खिडकीसमोर उभी राहून समजूत घातल्याप्रमाणे सांगते. ''पिलू इथे आहे. व्यवस्थित आहे त्याच्या पट्ट्या मी आता सोडणार आहे.'' त्यावेळी मादी टायरॅनोसॉर आपले डोके खिडकीतून आत घालते आणि पिलाच्या पायाचे प्लॅस्टर चाटू लागते... नंतर मादी त्या बेशुद्ध पिलाला उचलून बाहेर काढते,

त्याला थोडे दूर नेऊन एका झाडावर ठेवते. नर व मादी दोघेही नंतर ट्रेलरला दणका देतात. कड्याच्या दिशेने ट्रेलर रेटू लागतात. माल्कम ट्रेलरमधले दिवे लावतो. सारा संरक्षक आवरणांवरची काच फोडून बटण दाबते. तर बरच्या बाजूला ठिणग्यांचा पाऊस पडतो. टायनोसॉरच्या किंकाळ्या ऐकू येतात. ते दूर जाताना दिसतात.

थॉर्न आणि एडी दुसऱ्या ट्रेलरमधून पहिल्या ट्रेलरला रोखण्याचा प्रयत्न करतात. माल्कमचा जीव सारा वाचवते.

माल्कम तिला सांगतो, ''मी डार्विनला जो जाणवला नाही, असा एक सिद्धांत मांडण्याच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी या बेटावरचा प्रयोग आवश्यक होता. पण तो आता अर्धवटच राहणार... सजीवांची जीवनप्रणाली ही फार गुंतागुंतीची प्रणाली आहे... गेल्या दहा हजार वर्षात माणसानं शिकार करण्याच्या अवस्थेपासून अवकाशात संचार करण्याच्या अवस्थेपर्यंत मजल मारली. आता तर माणूस पृथ्वीवरचं पर्यावरणच बदलू पहात आहे. त्याचा सजीवांवर काय परिणाम होईल कोण जाणे! माझ्या मते यातून आपण आपल्या प्रजातीचा विनाश घडवणार आहोत. आपल्या प्रजातीची उत्क्रांती ही वर्तनातून होत असते. वर्तनातील बदल म्हणजे उत्क्रांती. पण आज प्रसारमाध्यमांमुळे जग एकत्र येतेय, ज्ञान सर्वत्र पसरतेय. त्यामुळे स्थानिक विविधता नष्ट होते आहे. बौद्धिक विविधता नष्ट झाली तर माणसाची उत्क्रांत होण्याची क्षमताच संपुष्टात येईल. सगळं काही एकसमान, एक विचार, एक कृती, एक आवड. सजीवांचे हे नवं वर्तन माणसाच्या विनाशाला कारण ठरेल. (पृष्ठ २५४)

आता या बेटावरून बाहेर पडायला हवं असं माल्कम सांगतो.

एक रॅप्टर मचाणावर बसलेलल्या एडीवर हल्ला करतो. त्याची किंकाळी त्या शांत वातारणात घुमत राहते.

आर्बी मचाणावरून खाली पडतो. तो एका पिंजऱ्यात शिरतो. रॅप्टर त्याच्यावर हल्ला करतात, पिंजरा गडगडत नेऊ लागतात. मचाणावरच्या केबिनच्या छपरावरून केली खाली बघते. जमिनीवर डोकं घासणारा रॅप्टर तिला दिसतो. त्याच्या मानेत इलॅस्टिक रिंग घट्ट अडकलेली असल्याने तो किंचाळत असतो.

थॉर्न जीपने येत असतो. ती जीप जवळ आल्यावर रॅप्टर उडी मारून जंगलात जातो. त्यांनी ऑर्बीला नेलंय असं लेविन त्याला सांगतो.

ट्रेलरमध्ये बसलेल्या माल्कमला त्यांचे बोलणे ऐकू येते.

थॉर्न व लेविन यांना रॅप्टरच्या घरट्याची जागा सापडते. त्या घरट्यात तीन पिल्लं दिसली. ती एकमेकांशी भांडत होती. कुजत असलेले चार सांगाडे बाजूलाच पडले होते.

लॉस अल्मॉसमध्ये तयार झालेल्या मेटॅसिओलिन या जहाल विषाची बाटली लेविन बाहेर काढतो. त्याच्यातून कोलिन-इस्टरेज वायू स्वरूपात बाहेर पडतो आणि काही मिनिटांसाठी सर्व सजीव प्राणी पूर्ण अपंग व लुळेपांगळे पडतात. तेथील दहा रॅप्टर्सच्या बाजूला तो ती फेकणार असतो, पण आर्बीला वाचवायचं तर याचा वापर करणे इष्ट नाही हे त्याच्या लक्षात येते. तेव्हा जीपला तो पिंजरा बांधून लेविन जीप भरधाव सोडतो. ऑर्बी वाचतो.

दि लॉस्ट वर्ल्डचा काही थांगपत्ता लागतो का?

माल्कम म्हणतो, ''माणूस हा फार विध्वंसक प्राणी आहे. विध्वंस करणं हेच पृथ्वीवरचं



आपलं काम असावं. बहुतेक पृथ्वीवर काही विशिष्ट काळानंतर अशी एखादी जात अवतरते आणि ती पृथ्वीला साफ करून नवीन सजीवांच्या उत्क्रांतीसाठी अनुकूल वातावरण येथे निर्माण करीत असावी. मानवाचं वर्तन हे अहंकार आणि स्वाभिमान या गोष्टींवर अवलंबून आहे. पण या गोष्टी शास्त्रीय नाहीत. माणसाचं स्वत्व म्हणजे काय हे बशीत काढून ठेवता येईल का? नाही. कारण मुळातच ते अस्तित्वात नसते... पण हे जीवन फार सुंदर आहे. जगणं हे वरदान आहे. सूर्य पाहणं, फुफ्फुसात हवा भरून घेणं- यापेक्षा वेगळं काही नाहीच...''

विज्ञानाच्या अतिप्रगत अवस्थांशी अवगत असणारा डॉ.इयान माल्कम अशी तत्त्वज्ञानाची भाषा बोलू लागतो तेव्हा आपण भारतीय वाचक थक्क होतो. आपली अवतार कल्पना तरी काय वेगळी आहे का?

डायनोसॉरच्या वेगवेगळ्या प्रकारांचे, रॅप्टर्स व इतर प्राण्यांचे बरेच वर्णन यात आले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संशोधनक्षेत्रातील धडपडीचे, नव्या औषधांचे अनधिकृत प्रयोग करण्याचे डावपेचही या कथानकाच्या चौकटीत वरचेवर वापरले आहेत. एका मोहिमेची हकीकत या सूत्रामुळे जेव्हा डायनोसॉरपेक्षा इतर गोष्टींची वर्णने येतात तेव्हा कथानकाचा वेग ढेपाळतो. पण एका वेगळ्या सृष्टीत नेणारे हे पुस्तक थरारकथा म्हणून वाचकाला गुंतवून ठेवतेच ठेवते.

**किंमत : २२०रु. सवलतीत : १८७रु.**
**सभासदांना :१६५ रु. पोस्टेज :२०रु.**


T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

## T बुक क्लब म्हणजे ग्रंथपेमी वाचकांचे आकर्षण


**जगप्रसिद्ध इंग्रजी कादंबऱ्यांचे सरस मराठी अनुवाद आणि तेही निम्म्या किमतीत!**

### टी बुक क्लब १०मधील प्रकाशित पाच पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| फिअर इज द की | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | १६०रु. |
| द सिस्टरहुड | कॉलिन फोर्बस् | अनु. अंजनी नरवणे | २५०रु. |
| कन्टेजन | डॉ. रॉबिन कुक | अनु. प्रमोद जोगळेकर | २४०रु. |
| द लॉस्ट वर्ल्ड ३००१ | मायकेल क्रायटन | अनु. प्रमोद जोगळेकर | २२०रु. |
| द फायनल ओडिसी | आर्थर क्लार्क | अनु. प्रमोद जोगळेकर | १५०रु. |

**४० रुपये भरून टी बुक क्लब १० चे सभासद व्हा आणि क्लबमधील पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!**


**मेहता पब्लिशिंग हाऊस** १२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटजवळ,
पुणे - ४११०३० फोन - ४४७६९२४ E-mail : mehpubl@vsnl.com




# पूजाघर

मूळ लेखिका : प्रतिभा राय
अनु. : डॉ. वासुदेव जोगळेकर/
राधा जोगळेकर

**ओरिसातील जनजीवनामधील नवे ताणतणाव दाखवणाऱ्या कथा**

साहित्यअकादमी पुरस्कार मिळविणाऱ्या आरिसाच्या लेखिका डॉ.प्रतिभा राय यांच्या आजवर १८ कादंबऱ्या आणि १६ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. कटक जिल्ह्यातील बालीकुदा परगण्यात १९४४ साली जन्म, पाचव्या इयत्तेत असतानाच पहिल्या कवितेची प्रसिद्धी, वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊनही नंतर वनस्पतीशास्त्रात बी.एस्सी आणि शिक्षणशास्त्रात एम.एड, शैक्षणिक मानसशास्त्र या विषयात डॉक्टरेट आणि महाविद्यालयात अध्यापनकार्य. असा त्यांच्या जीवनाचा एक आलेख निघू शकतो, त्याचप्रमाणे वाङ्मयीन क्षेत्रातील कर्तृत्वाचा वेगळा स्वतंत्र आलेखही निघू शकतो. वयाच्या तिसाव्या वर्षी पहिल्या कादंबरीचे व १९७८ साली पहिल्या कथासंग्रहाचे प्रकाशन, स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून केलेले लेखन, द्रौपदीच्या जीवनावरील याज्ञसेनी या कादंबरीला मिळालेला मूर्तिदेवी पुरस्कार, कोणार्कच्या सूर्यमंदिरावर आधारलेल्या कांदबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार, आस्ट्रेलियातील भारतीय महोत्सवात लेखकांच्या शिष्टमंडळात स्थान, सोविएत युनियनचा दौरा, मुलांसाठी लेखन, अनेक भाषांमध्ये कथाकादंबऱ्यांचे अनुवाद- असे अनेक पराक्रम त्यांच्या लेखन कर्तृत्वाचा आलेख उंचावर नेऊन ठेवतात. मराठीत याआधीही त्यांचे काही साहित्य अनुवादित झालेले आहे.

'पूजाघर' या कथासंग्रहाच्या अनुवादामुळे प्रतिभा राय यांच्या आवडीच्या आशयकेंद्रांशी आणि लेखनशैलीशी परिचय होण्याची संधी मराठी वाचकांना मिळेल.

पूजाघरमध्ये बारा कथांचा समावेश आहे. ओरिसामध्येही गेल्या काही दशकात सरंजामशाहीकडून आधुनिकतेकडे समाजाची झपाट्यानं वाटचाल चालू आहे. जीवनशैलीचे आणि जीवनमूल्यांचे जुने आदर्श मोडून पडत चालले आहेत आणि नवे आदर्श अजून अंगवळणी पडायचे आहेत. असा संक्रमणाचा काळ एक लेखिका म्हणून प्रतिभा राय यांना सारखा हुलकावण्यात देत आहे, आपल्या लहरी व स्वच्छंद वर्तनाने धक्के देऊन चक्रावून सोडत आहे असे वाटते.

पूजाघर ही पहिलीच कथा. वीसखोल्यांचं भलंमोठं घरही कमी पडावं, आधीच दोन खोल्या आणखी जास्त बांधल्या असत्या ती किती बरं झालं असतं अशा विचारांची घरमालकाची



## पुस्तकाची खास वैशिष्टचे...

- ओरिसामधील अग्रगण्य लेखिकेच्या निवडक कथांचा मूळ ओरिया भाषेवरून केलेला अनुवाद
- सरंजामशाही वातावरण आणि आधुनिक मूल्ये यांच्यातील संघर्षाचे चित्रण
- माणसाच्या चांगुलपणाची आणि असहायतेची भिन्नविभिन्न रूपे
- चांगली माणसेही प्रसंगी संवेदनशून्य असल्यासारखी का वागतात?

तगमग होत असते. नवराबायको, तीन मुलं, दोन कुत्री, एक स्वयंपाकी, एक नोकर, एक नोकराणी, बागेसाठी माळी अशा त्या छोट्या सुखी परिवाराचे नित्याचे व्यवहार सुरळीत चालू असतात; पण त्यात व्यत्यय येतो आणि सगळेच गाडे बिनसते. उच्चरक्तदाब आणि मधुमेह यांनी त्रस्त झालेली ७५ वर्षे वयाची घरमालकाची आई उपचारासाठी व कायम राहण्यासाठी मुलाकडे येते; आणि घराची सगळीच घडी विस्कटते. या वृद्ध आईसाठी घरात सोयीस्कर खोलीच नव्हती. तरी बरं, घराचं नाव मातृछाया असं होतं. आणि ज्या घरात मातृपूजा नाही त्या घराची कधी उन्नती होत नाही असा या घरमालकाचा, त्या मातेच्या मुलाचा ठाम विश्वास होता. चार मुलं, दोन मुली असा भरगच्च कुटुंबकबिला असणाऱ्या या आईनं राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न अशीच नावं आपल्या मुलांची ठेवली होती; आणि पतीच्या अकाली निधनानं डगमगून न जाता त्यांना भरपूर शिकवून उत्तम नोकरी व्यवसायात सुस्थिर होण्यासाठी अमाप कष्ट उचलले होते. आज शहरात प्रत्येकाचं स्वत:चं घर आहे. ती मात्र स्वत: गावीच राहून नातवंडांसाठी तांदूळ, तूप, लोणची, लिंबं, केळ्यांचे घड, बोरं, कैऱ्या, फणस वगैरे पाठवत राह्यची. शहरात ती मुलांकडं दोनदोन दिवस राही आणि गावी निघून जाई.

सर्वात मोठं घर लक्ष्मणचं. वीस खोल्यांचे. तेव्हा आईनं त्याच्याचकडं राहणं इष्ट यावर इतर भावांचं एकमत.

आईसाठी मग बॉक्सरुम खाली करण्यात आली. पण प्रश्न पडला तिच्या देवांचा. ते ठेवायला देवघर कुठलं आणायचे? इतर सगळ्या खोल्या सामानानं भरलेल्या. प्रतिभा राय उपरोधाने लिहितात, "या घरात नोकर, गाईगुरं, कुत्री- एवढंच काय, चपलांसाठी सुद्धा वेगळ्या खोल्या आहेत." मग आईच्या देवांसाठी खोली कुठून मिळणार?

शेवटी जिन्याखालच्या जागेत देवघराची प्रतिष्ठापना होते. सगळे देव आई सत्यभामा आसनावर मांडते.

देवघरामुळे घरातल्या प्रत्येकाला त्याचा धाक वाटू लागला. सुरेखाला आधीसारखं मोकळं वागता येईना. नोकरचाकर, माळी, स्वयंपाकी यांच्यावर पूर्वीसारखं ओरडता येईना; दिवसा हवं तेव्हा विश्रांतीसाठी बेडवर पहुडता येईना, नातवंडांना शिटी वाजवता येईना...

एक दिवस आई अचानकपणे आकाशाकडे बघून म्हणते, ''जाते आता वरती.'' नमस्कारासाठी हात जोडते, आणि देवघरातच जमिनीवर आडवी होते.

तिच्या मृत्यूनंतर देवांची रवानगी मूळ गावी होते. पण आता जिन्यातून जाता येता त्या लक्ष्मणला सुनंसुनं वाटतं. त्याच्या मनात येई, पायांखाली पूजाघर होतं म्हणून पायांना चांगलं वाईट जाणण्याची समज येत होती. आई एकाच जागी बसून असली तरी देवासारखेच तिचे डोळे सगळीकडे आपला पाठलाग करायचे... जिन्यातून वर जाताना पायांखाली तिचे देव, ती आणि पूजाघर राहत असे. खरं पाहता, आईत्या त्यागमय जीवनाची बूज न राखता, तिची जीवनमूल्यं पायदळी तुडवूनच लक्ष्मण यशाची शिडी चढला होता.

आणि लेखिकेचे यावरचे अंतिम भाष्य असे आहे ''आजच्या या काळात घरात ७५ वर्षांची आई आणि पूजाघर या दोन्ही गोष्टी विसंगतच. जिन्याखालची खोली वास्तविक अडगळीची तरी ती पार केल्याशिवाय वर चढता येत नाही. तसंच देव आणि आई यांच्या शिवाय आपल्या जीवनाचं आणि सृष्टीचं अस्तित्वच टिकवणं आणि परिपूर्ण होण्याची शक्यता बाळगणं दुरापास्तच!''

आजच्या आधुनिक स्पर्धात्मक युगात आपलं जग एकीकडं विशाल वैभवशाली होत जातंय, पण दुसरी कडं आपल्या मूळ आधारालाच उखडून ठेवत आहे, आपल्या जन्मदात्यांनाही तयात सामावून घेऊ शकत नाही असा काहीतरी विचित्र पेच लेखिका आपल्यापुढे ठेवते. नवऱ्याच्या अकाली मृत्यूनंतर शेतीवाडी सांभाळून चार मुले व दोन मुली यांचे व्यवस्थित पालनपोषण करून त्यांना स्थैर्य देणारी, पूजाघरात त्यांच्या चुकीची जाणीव देऊन, सत्याच्या मार्गावर जाण्यासाठी त्यांना शपथ घ्यायला लावणारी सत्यभामा शेवटी पूजाघरातच जास्तीत जास्त वेळ घालवते आणि एक दिवस फटकन मरूनही जाते. तिच्या त्यागाचे, मूल्यांचे व जीवनशैलीचे मोल आणखीनच गडद-गर्द होत जाते. अशी आदर्श माणसे रंगविण्याची ओढ या उडिया लेखिकेला असल्याचे जाणवते.

आपल्या उच्चपदस्थ नवऱ्याजवळ लोक सारखे येऊन त्याचा गैरफायदा घेतात म्हणून दारावरूनच त्या लोकांना हाकलून लावण्यासाठी शुभदा विश्वासू व दक्ष पहारेकरी ठेवते. माणसं बघून आत घ्या हा तिचा आदेश. नारायण मास्तरांना तर हे पहारेकरी चार वेळा परत घालवतात. तेव्हा ते शुभदाला पत्र पाठवतात ,''बेटी, तुझ्या यजमानांची कीर्ती, मुलांचे कर्तृत्व- याबद्दल आनंद वाटतो. मी आता वृद्ध, पंगू झालो आहे. एक पाय स्मशानात. सध्या बेकार आहे. तू मदत करशील या आशेनं आलो होतो. तुझ्याकडं यायचं तर पंधरा रुपये खर्च होतात. तेही माझ्याकडे नसतात. म्हणून हे पत्र. तुझं उत्तर आलं तर काय करायचं ते ठरवणार. एक महत्त्वाचं काम आहे.''

ती त्यावर उत्तर पाठवित नाही. शुभदाचे ते शिक्षक. मार्गदर्शक तिला सरस्वतीच्या



रूपात बघणारे. ती नाव काढील असं मानणारे. आपले हे प्रिय गुरू चार वेळा येऊन गेले- आपल्याकडे मदतीची अपेक्षा बाळगतात. हेच तिला आश्चर्य वाटते. नंतर एक रजिस्टर्ड पत्र येते, ते नारायण मास्तरांच्या मुलाचे असते. त्यात म्हटलेले असते, ''पंधरा दिवसांपूर्वी बाबा गेले. तुझ्या पत्राची वाट पहात होते. शेवटी कर्जाचं ओझं घेऊन गेले. माझ्या बहिणीच्या लग्नाच्या वेळी तुझ्या वडिलांनी दोन हजार रुपये स्वत:हून दिले होते. ते बाबांनी नाइलाजाने घेतले. कर्ज म्हणून मानले. त्या कर्जाची फेड करण्यासाठी त्यांनी फक्त राहतं घर माझ्यासाठी ठेवून बाकीची जमीन तुझ्या नावावर केली आहे. ती विकून येणारे पैसे तू तुझ्या भावांना द्यावेस अशी विनंती करण्यासाठी ते चार वेळा तुझ्याकडे आले होते. आम्ही असहाय, त्यामुळे गावातले लोक ती जमीन कवडीमालानं हस्तगत करू पहात होते. म्हणून तू लक्ष घालून बाबांचं कर्ज वळतं करून घ्यावसं असे ते इच्छित होते. पण तुझं उत्तर न आल्याने ते कर्जाचं ओझं घेऊन गेले.''

हे पच वाचल्यावर मास्तरांनी आपल्यावरच दु:खाचं आणि अपराधाचं ओझं टाकलयं असं शुभदाला वाटतं.

'ते आले होते' या कथेतील नारायण मास्तरांच्या मोठेपणाचे आणि प्रामाणिकपणाचे हे दर्शन स्तिमित करते.

स्वत:ला मूलबाळ नसल्याने रमाराणी इतरांच्या मुलांवर प्रेमाचा वर्षाव करतात. पण त्या वात्सल्याला बेबी सिटिंग समजून जेव्हा त्यांच्या घरातील भाडेकरू मिसेस वर्गिस शंभर रुपये तिच्या हातावर टिकवते तेव्हा मात्र तिला घर सोडून जायला सांगते. (वार्धक्य भत्ता) रमाराणीचे पती अखिलबाबू 'घर भाड्याने देणे आहे' अशी जाहिरात वृत्तपत्रात देतात. पण त्यात 'अपत्यहीन कुटुंबांनीच संपर्क साधावा' अशी अट घालतात. ''आजन्म मुलांच्या प्रेमाला भुकेली रमाराणी दुसऱ्यांच्या मुलांवर भरपूर प्रेम करील आणि योग्य प्रतिसाद नाही मिळाला तर परत अपेक्षाभंगांच्या दु:खाने आणखी जास्त घायाळ होईल.'',

लेखिकंचे भाष्य आणखीही एका पैलूंकडे लक्ष वेधते, ''त्या मातृहृदयाच्या सरळ साध्या शब्दकोशात पारिश्रामिक, बेबी सिटिंग चार्जेस, लाभहानी, वार्धक्यभत्ता असले जटिल आणि अत्याधुनिक शब्द अर्थहीन होते.''

आपल्या ऑफिसमध्ये आपल्या गावाकडून आणलेल्या कलुवा या उनाडक्या करीत हिंडणाऱ्या मुलाला नीलाद्रीबाबू व वसुधा काम देतात. पण तो काही दिवसांनीच गावी परत जातो. घरातली चारशे रुपयांची शाल गहाळ झाल्याचे लक्षात येताच वसुधा आपला इन्स्पेक्टर आतेभाऊ रणजित याला घेऊन गावी जाते. कलुवाचा बाप पोलिस बघताच घाबरून काकुळतीला येतो. मार खाण्यापेक्षा तो सरळ म्हणतो, ''साहेब, मुलगा लहान आहे... शाल आणली असेल. हवी ती शिक्षा करा,'' ''ती शाल परत दे.'' ''ती तर शेजारच्या गावात विकली. दिडशेला.'' ''मग दीडशे रुपये दे.'' तेव्हा गावचा सरपंच तेवढे पैसे देतो.

... काही दिवसांनी वसुधाला घरीच टाईपरायटरच्या कप्प्यात ती शाल मिळते. ती रणजितला ते सांगते, त्या म्हाताऱ्यानं ते चोरीचं आपल्या अंगावर का ओढवून घेतलं याचं तिला आश्चर्य वाटतं. रणजित गर्वानं म्हणतो,''हा सगळा आमच्या पोलिसी छडीचा प्रताप.'' मात्र तो शाल सापडल्याचे कळवू नका असे बजावतो. वसुधा कलुवासाठी एक चादर व पन्नास

रुपये देण्यासाठी सुधीरला पाठवते तर त्याला कळते, गावची अब्रू घालवली म्हणून त्या बापलेकांना गावकऱ्यांनी मारले. दंड केलस. म्हातारा त्यात मेला. कलुवा गाव सोडून पळाला.

त्यावेळेपासून वसुधाला एक अजब व्याधी पछाडते. शाल अंगावर घेतली की तिच्या छातीत दुखू लागते. शाल काट्यासारखी बोचते.

माती खणणाऱ्या मजुरावर दरड कोसळून तो मरतो. त्याच्या आईला एक लाखाची भरपाई मिळते. पण गावचा पुढारी फक्त हजार रुपये तिच्या हातावर ठेवून हेच लाचा समज असे म्हणतो. (गोष्ट एका लाखाची)

-अशा वेगवेगळ्या समाजाच्या स्तरांची सुखदु:खं सांगणाऱ्या कथानकांची विविधता प्रतिभा राय यांच्या लेखनात आढळते. उच्च आदर्शांची येथे पायमल्ली होते, समाजाचे वास्तव काही वेगळेच असते. मूल्यांना येथे काही किंमत नसते. सज्जनांनाच सगळे दु:ख सोसावे लागते. जगाचा न्याय चमत्कारिक असतो. इथली पापपुण्याची व फलप्राप्तीची गणिते काही वेगळीच असतात.

प्रतिभा राय यांच्या कथा असे काहीतरी वेगळे वास्तव वाचकांपुढे ठेवून वाचकांच्या पायाखालची जमीनच जणू काढून घेतात.

या कथांचा अनुवाद डॉ.वासुदेव व राधा जोगळेकर या दांपत्यानं केला आहे. हे दांपत्य ओरिसातील कटक या शहरीच वास्तव्याला आहे. मूळ ओडिया भाषेवरूनच हा अनुवाद झालेला आहे, त्यामुळे प्रतिभा राय यांच्या मूळ शैलीशी व शब्दसंपदेशी आपली बरीच सलगी होऊ शकते. या कथासंग्रहातील कथा प्रतिभा राय यांच्या श्रेष्ठ गल्प, मनुष्य स्वर, पृथक ईश्वर आणि गवत आणि आकाश या चार संग्रहांतून निवडलेल्या आहेत. आंतरभारतीचा हा एक लक्षवेधक प्रकल्प म्हणून महत्त्वपूर्ण ठरेल.

**किंमत : ८० रु. सवलतीत : ६८ रु.**

**सभासदांना : ६०रु. पोस्टेज : २५ रु.**


**स्त्री जीवनाची समग्र ओळख करुन देणारे दर्जेदार साहित्य**

| | | |
|---|---|---|
| **चाकाची खुर्ची** | **नसीमा हुरजूक** | **१८०रु.** |
| **अणसार** | **अनु. अंजनी नरवणे** | **१८०रु.** |
| **ब्लास्फेमी** | **अनु. भारती पांडे** | **१५०रु.** |
| **कांचनगंगा** | **माधवी देसाई** | **१५०रु.** |
| **तीन दगडाची चूल** | **विमल मोरे** | **१५०रु.** |
| **हितगुज** | **अनु. वृंदा दाभोळकर** | **२००रु.** |
| **द्वंद्व** | **अनु. वनिता सावंत** | **१५०रु.** |
| **टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका** | **अनु. सुधा नरवणे** | **१८०रु.** |
| **द सिस्टरहुड** | **अनु. अंजनी नरवणे** | **२५०रु.** |

**मेहता पब्लिशिंग हाऊस** १२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटजवळ,
पुणे - ४११०३० फोन - ४४७६९२४ E-mail : mehpubl@vsnl.com




# श्रद्धांजली

**डॉ. वसंत मून यांचे निधन**

'आंबेडकरी चळवळीचा समग्र माहितीकोश'अशा शब्दात डॉ. वसंत मून यांच्या संशोधन व लेखनकार्याचा उल्लेख करता येईल. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत बालपणापासून त्यांची आंबेडकरी चळवळीतील घटनांशी नाळ जोडली गेली होती. शेड्यूल कास्ट फेडरेशन, विद्यार्थी संघटना व समता सैनिक दलाचा कार्यकर्ता या नात्याने त्यांची सामाजिक कारकीर्द सुरू झाली. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुद्ध धम्म या विषयावरील वैचारिक साहित्यविश्वातच ते अधिक रमले. २ एप्रिल रोजी त्यांचे निधन झाले.

आईने घरासाठी काही खरेदी करण्यासाठी दिलेल्या पैशातून काही रक्कम जमतून मून यांनी पुस्तकाची खरेदी करून, नागपुरात देवस्थान कमिटीच्या स्टँडवर विद्यार्थी दशेतच वाचनालय सुरू केले होते. डॉ.आंबेडकर यांच्या नागपुरातील ऐतिहासिक धर्मांतराच्या कार्यक्रमाचे संयोजन करण्याच्या कामी त्यावेळी त्यांनी आपल्यापरीने मदत केली होती. नायब तहसीलदार ते उपजिल्हाधिकारी अशा सरकारी सेवेतील प्रवासात डॉ. मून यांनी बाबासाहेबांच्या अप्रकाशित साहित्याचे संपादन करण्याच्या कार्याला व संशोधनालाच अधिक महत्त्व दिले.

पुसदला नायब तहसिलदार असताना बाबासाहेबांची पुस्तके ठेवली, तर सीआयडीचे लोक धाड टाकतील, अशी भीती एका मित्राने दाखविली. त्यावेळी एका रात्रीत त्यांनी सुमारे २०० दुर्मिळ ग्रंथावर चुलत बहिणीचे नाव टाकून, ते स्वत:च्या दफ्तरी ठेवले होते. यातूनच त्यांचे ग्रंथप्रेम दिसून येते.

'डॉ.आंबेडकर लेख आणि भाषणे' या मालिकेतील २० खंडांचे संशोधन, लेखन व संपादन करण्याची त्यांची बहुमोल कामगिरी इतिहासात नोंद होण्यासारखी आहे. बाबासाहेबांचे अप्रकाशित साहित्य जगासमोर यावे, यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची तुलनाच करता येणार नाही. डॉ.आंबेडकरांच्या 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या दोन खंडांचे संपादन त्यांनी केले होते. त्यांच्या नावावर पन्नासहून अधिक ग्रंथ आहेत.

आंबेडकरी चळवळीतील गटबाजीच्या राजकारणात डॉ.मून कधी रमले नाहीत. मात्र संशोधन कार्याला उत्तेजन मिळावे यासाठी त्यांनी 'डॉ.आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूट'ची स्थापना केली होती. त्यांच्या 'वस्ती'या आत्मचरित्राने दलित साहित्यात आगळा ठसा उमटविला. या आत्मचरित्राच्या इंग्रजी आवृत्तीचे गेल्या महिन्यात मुंबईत प्रकाशन झाले. मून यांचा तो अखेरचा कार्यक्रम असावा. गेली दोन वर्षे त्यांना प्रकृती साथ देत नव्हती. बाबासाहेबांचे अप्रकाशित साहित्य प्रसिद्ध करणे व संशोधनाचे काम पुढे नेणे, हीच या व्यासंगी कार्यकर्त्याला खरी आदरांजली ठरेल.

### शाहीर दादा उपळेकर यांचे निधन

'शाहीर दादा उपळेकर यांच्या निधनाने 'नाशिकचा गालिब' हरवला आहे. दादा केवळ गालिबच्या शायरीवर प्रेम करणारे नव्हते, तर एक माणूस म्हणूनही त्यांची उंची मोठी होती.' अशा शब्दात विनायकदादा पाटील यांनी श्री.उपळेकर यांना श्रद्धांजली वाहिली.

शाहीर उपळेकर यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रोटरी क्लबमध्ये कार्यक्रमात झाला. रामदास जाधव अध्यक्षस्थानी होते. या वेळी निजामोद्दिन काद्री, सुधीर सराफ, जावेद खान, रमेश बाफना, एजाज अंजुम, अजमल खान व मजिदभाई यांनी दादांच्या आठवणी सांगितल्या.

ॲड.नंदकिशोर भुतडा यांनीही आदरांजली वाहिली. 'बज्मे-याराँ'तर्फे झालेल्या या सभेत संस्थेचे अध्यक्ष आदम मुल्ला यांनी दादांमुळे संस्था पोरकी झाल्याचे म्हटले. 'देशदूत'चे कार्यकारी संपादक प्रदीप निफाडकर यांनी सूत्रसंचालन केले. कवी रज्जाकसर यांनी दादांवर लिहिलेली कविता म्हटली. यावेळी श्री. उपळेकर यांचे पुत्र प्रदीप, शेखर, भूषण उपस्थित होते.

### ज्येष्ठ गीतकार आनंद बक्षी यांचे निधन

हिंदी चित्रपटक्षेत्रातील ज्येष्ठ गीतकार आनंद बक्षी (वय७२) यांचे ३० मार्च रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे आणि दोन मुली असा परिवार आहे.

आजारी असल्याने, सहा महिन्यांपूर्वी बक्षी यांना मुंबई येथील नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेली सुमारे ४५वर्षे बक्षी गीतलेखन करीत होते. त्यांनी आतापर्यंत सुमारे चार हजारांहून अधिक गाणी लिहिली आहेत. मिलन, महल, दो रास्ते, हिमालय की गोद मे, जीवन मृत्यू, अमर प्रेम, खिलौना, सफर, बॉबी, अशा अनेक चित्रपटांसाठी आंनद बक्षी यांनी गीते लिहिली. अलीकडच्या काळातील मोहब्बतें आणि यादें या चित्रपटातील त्यांची गाणीही गाजली होती. लक्ष्मीकांत-प्यारेलाल, आर.डी.बर्मन, यांसारख्या संगीतकारांबरोबर बक्षी यांनी केलेल्या कामाची खूप तारीफ झाली. त्यांना प्रचंड रसिकमान्यताही मिळाली. बक्षी यांची अनेक गाणी नवोदित नायक व नायिकांचे चित्रपट यशस्वी करण्यासाठी मोठा हातभार लावून गेली.





# फुले आणि काटे

### स्टाइन बेकची जन्मशताब्दी

'द ग्रेप्स ऑफ रॉथ'या कादंबरीचे लेखक जॉन स्टाइनबेक यांची जन्मशताब्दी कॅलिफोर्नियातील सालिनास या त्यांच्या गावी उत्साहाने साजरी केली जात आहे. ते हेमिंग्वे, फॉकनर यांचे समकालीन. तिघेही नोबेल पारितोषिकाचे मानकरी. पण खऱ्या अर्थाने या दिग्गज लेखकांपैकी प्रत्येकाची शैली वेगळी आणि विषयही वेगळे. तरीही त्यांच्या चाहत्यांत यापैकी कोण श्रेष्ठ हा वाद सतत रंगतो. काहींनी त्याला साधा शालेय विद्यार्थ्यांचा आवडता लेखक ठरवले आहे. जाणतेपणे मानवी मनाचा शोध घेणारा हा लेखक नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

स्टाइनबेक यांची जन्मशताब्दी न्यूयॉर्कसह अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे साजरी करण्यात येत आहे. आयुष्याची अखेरची १८ वर्षे त्यांनी न्यूयॉर्कमध्ये काढली. या शताब्दी कार्यक्रमांबाबतची अधिक माहिती http://www.stenbeck100.org/newevents.html येथे मिळू शकेल. स्टाइनबेक यांच्याशी नाते जुळलेल्या शहरांप्रमाणे सालिपास हेही आता 'द ग्रेप्स ऑफ रॉथ'मध्ये वर्णन केल्याप्रमाणे भुकेल्या निर्वासितांनी वेढलेले शहर राहिलेले नाही. 'नॅनरी रो' आणि 'टोरिल्ला फ्लॅट'मध्ये वर्णन केलेले निर्वासित आणि हलाखीच्या स्थितीत जगणारे लोक आता तिथे दिसणार नाहीत. त्यांची जागा आता मालदार बुटिक मालकांनी घेतली आहे. तरीही स्टाइनबेक यांच्या निधनानंतर म्हणजे १९६८ सालानंतर लोक त्यांच्याबाबत चांगलेच जागरुक झाले आहेत आणि त्यांचं म्हणून जे काही आहे, ते त्यांना जतन करायचे आहे. त्यासाठी सालिनासच्या स्टाइनबेक सेंटरमध्ये या वर्षात भाषणे, परिसंवाद, स्टाइनबेकच्या साहित्याचे जाहीर वाचन, संगीत मैफली, चित्रपट प्रदर्शन आणि अन्य कार्यक्रम होतील.

अमेरिकेत आणि अन्यत्र, विशेषत: जपानमध्ये स्टाइनबेक यांचे साहित्य अद्यापही मोठ्या प्रमाणावर वाचले जाते. शोषित आणि पददलितांबाबतचे त्याचे प्रेम हे याचे कारण आहे. असे अनेकांना वाटते. त्यांचे वर्णनच त्याने 'द गॅदर्ड अॅन्ड द स्कॅटर्ड' (जमलेले आणि विखुरलेले) असे केले आहे. अनेक वर्ष स्टाइनबेक त्यांच्यातच राहिले आणि त्यांनी त्यांचे बारकाईने वर्णन केले. सालिनास येथे शताब्दीला त्यांच्या शंभराव्या वाढदिवशी, २७ फेब्रुवारी रोजी सुरुवात झाली. एकूण ३९ राज्यांत शताब्दीचे १७५ कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अमेरिकन लेखकाच्या बाबतीत हा एक विक्रमच आहे. यापैकी अनेक कार्यक्रमांना आर्थिक सहाय्य 'नॅशनल एंडोमेंट फॉर द ह्युमॅनिटीज' तर्फे मिळाले आहे. ना नफा ना तोटा तत्त्वावर काम करणाऱ्या सांस्कृतिक संस्था आणि शंभर स्थानिक वाचनालयांना एकूण २,६०,०००डॉलरची मदत देण्यात आली आहे.

'द ग्रेप्स ऑफ रॉथ' ही स्टाइनबेकची सर्वोत्तम कलाकृती समजली जाते. १९३८ साली

सहा महिन्यांच्या काळात त्यांनी ती लिहिली. बेपर्वा जमीनदारांकडून पिळवणूक केल्या गेलेल्या कामगारांच्या अवस्थेचे चित्रण त्यांनी या कादंबरीत केले आहे. त्यामुळे त्यांना या जमीनदारांकडून खुनाच्या धमक्याही मिळाल्या होत्या. गुप्तचर खात्यातर्फे चौकशी झाली आणि कम्युनिस्टांबाबत त्यांना सहानुभूती असल्याचा आरोपही झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर कम्युनिष्टांवर जोरदार टीका करून त्यांनी सर्वाधिक दडपशाही करणारी सरकारे स्थापन केली आणि त्यामुळेच त्यांना सतत बंडाळीची भीती वाटत असते. त्यामुळे प्रत्येक माणसाने दुसऱ्याची माहिती सरकारला द्यायला हवी. असे त्यांचे सांगणे असे. शिवाय त्यांचे गुप्त पोलिस सर्वत्र विखुरलेले असतच. १९६०च्या दशकात तर व्हिएतनाममधील अमेरिकेच्या भूमिकेवर टीका करण्यात नकार देणाऱ्यांपैकी ते होते.

स्टाइनबेकना १९६२ मध्ये साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. ते स्वीकारताना त्यांनी म्हटले होते की, प्राचीन कालापासून चालत आलेल्या लेखकाच्या भूमिकेत बदल झालेला नाही. आपल्या अनेक चुका आणि अपयशे उघड करण्याचे आणि आपल्यात सुधारणा व्हावी म्हणून आपली काळीकुट्ट आणि भयानक स्वप्ने प्रकाशात आणण्याचे काम त्याला करायचे असते.

स्टाइनबेक यांच्या बहुतांश कलाकृती वाचण्यास सहजसोप्या, आणि चटकन समजू शकणाऱ्या आहेत. त्यामुळे काही उच्चभ्रूंची प्रवृत्ती त्यांच्याकडे हेटाळणीच्या नजरेने बघण्याची आहे. पण त्यांच्या कितीतरी पट अधिक लोक या कलाकृतींकडे आदराने बघतात. सॅन जोस स्टेट युनिव्हर्सिटीच्या इंग्रजीच्या प्राध्यापक आणि सेंटर फॉर स्टाइनबेक स्टडीजच्या संचालक सुसान शिलिंगफोर्ड म्हणतात. मला स्टाइनबेक, हेमिंग्वे आणि फॉकनर हे तिघेही कादंबरीकार आवडतात. त्यांच्या तुलनेमुळे स्टाइनबेक यांच्यावर अन्याय झाला. असे मला वाटत नाही. मला हेमिंग्वेचे गद्य आवडते आणि त्यांच्या काही लघुकथा या इंग्रजीतील सर्वोत्तम आहेत. असे मला वाटते. पण स्टाइनबक यांनीही त्याच प्रकारचे लेखन केले. साधे, सरळ आणि सोपे, मात्र त्यांच्या लेखनात जास्त माया आणि जिव्हाळा आहे. हेमिंग्वे साधारण निरीक्षकाची भूमिका बजावत, पण स्टाइनबेक मात्र आपल्याला बरोबर नेतात, सहभागी करून घेतात.

फॉकनर मात्र गुंतागुंतीचे आणि प्रयोगशील होते. याबाबतीत ते जॉइस आणि व्हर्जिनिया वूल्फच्या जातीचे होते. त्यामुळे त्यांची स्टाइनबेकशी तुलना करणे योग्य होणार नाही. ते मॅटिस आणि पिकासो यांची तुलना केल्यासारखे होईल. ते काही एकच परिणाम साधण्याचा प्रयत्न करीत नव्हते.

अमेरिका आणि अमेरिकन्स या लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकाच्याही शिलिंगफोर्ड संपादक आहेत. त्यात परकीय आणि अमेरिकन अशा २३ लेखकांनी स्टाइनबेक यांच्या गौरवपर लेख लिहिले आहेत.

सालिनास येथील सोहळ्यात स्टाइनबेक यांचा एकमेव हयात मुलगा सहभागी झाला होता. तो खूपसा वडलांसारखाच दिसतो. स्टाइनबेक यांना वस्तुमात्रांबद्दल आदरभाव होता. कुत्रा समोरून आला तरी हॅट उंचावून ते त्याला अभिवादन करीत असे त्यांची आठवण सांगताना तो म्हणाला. आम्हाला त्यांच्या पुस्तकांच्या स्वामित्व हक्कामुळे जे पैसे मिळतात, त्यावरून जेव्हा खडतर काळ असतो, तेव्हा त्यांच्या पुस्तकांचा खप वाढतो, असे आढळले आहे. संकटाच्या वेळी आपला वाटणाऱ्याचाच आधार लोकांना वाटतो!



◆ मे २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक सहावा

# ॥ मेहता मराठी ग्रंथजगत ॥

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १० रु.

✠ वार्षिक वर्गणी ८० रु.
तीन वर्षांची २००रु.
पाच वर्षांची ३००रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | २२ |
| **पुस्तक परिचय** | |
| गोष्टी चातुर्याच्या | ३१ |
| द लॉस्ट वर्ल्ड : अनु. प्रमोद जोगळेकर | ३४ |
| पूजाघर : अनु. वासुदेव/राधा जोगळेकर | ४० |
| **श्रद्धांजली** | ४५ |
| **फुले आणि काटे** | ४७ |
| **नवी स्पर्धा** | २१ |

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*